

# श्री साईलीला

किं. ५० पैसे

१९६७



स्थापना १९१६
साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे
सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी
ई. आर. मालपेकर,
जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २
टे. नं.
३५५७३१



# श्री साई वाक्सुधा

स्वतः कोणाचीही निंदा-नालस्ती करून आपण जशी जीभ विटाळूं नये त्याचप्रमाणें कोणी कोणाची निंदा करीत असेल ती ऐकूनही आपण आपले कान विटाळूं नयेत. जिव्हा, डोळे व कान अगदीं स्वच्छ, पवित्र ठेवावेत. हजारों कोसांवर अशी एखादी घटना घडली तरी तिचा सुगावा बाबांना लागत असे व तशा व्यक्ति आपल्यासमोर आल्या असतां ते त्याबाबतींत शक्य त्या मार्गानें जरूर ती जाणीव करून देत असत. थोडक्यांत म्हणजे निंदा-नालस्तीचें बाबांना वावडें होतें.

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४५ वें ] जून १९६७ [ अंक १५ वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

पडणें आणि चढणें ह्या परस्परविरोधी क्रिया आहेत. पडणें फार सुलभ असतें, परंतु चढणें मात्र कठीण व त्रासदायक असतें. पडण्याची क्रिया हां हां म्हणतां चटकन् होते तर चढतांना दम छाटला जातो. पडण्याचें काय ? जरा पाय चुकला कीं खालीं कोसळलाच म्हणून समजा. आणि वर चढतांना किती परिश्रम पडतात नाहीं का ?

सध्यांच्या काळाकडे नजर टाकली असतां काय दिसतें ? जिकडे तिकडे खालीं कोसळण्याचें, पतन पावण्याचें वातावरण ! तुम्हांला नैतिकदृष्ट्या किंवा इतर कोणत्याही दृष्टीनें खालीं खेचण्यासाठीं नाना प्रकारचीं व्यसनाधीन माणसें नि व्यसनें जय्यत तयार आहेत. त्यांची मुळींच वाण नाहीं. वाण जर कशाची भासत असेल तर ती म्हणजे तुम्हांला मदतीचा हात देऊन वर चढविणाऱ्यांची ! कुठेंही पहा, खालीं कोसळण्याचें वातावरण ! पुढें जाण्याचें व वर चढण्याचं नांव घ्यायला नको !

अशा परिस्थितींत माणसाचें पतन व्हायला कितीसा वेळ लागणार ? परंतु अशाही विपरीत परिस्थितींत जो सावधानतेनें व विचारानें वागणारा असतो तो स्वतःला सावरून धरूं शकतो व पडण्याच्या फंदांत तो पडूं शकत नाहीं. माणसाला कांहीं ना कांहीं आधार लागत असतो. त्यानें कोणावर तरी निष्ठा ठेवावी लागते. तें निष्ठास्थान वेळप्रसंगीं त्याचा बचाव करूं शकतें. त्याला पतनापासून बचावूं शकतें.

आपण निर्धार केला पाहिजे कीं, माझा जन्म पडण्यासाठीं नाहीं, वर चढण्यासाठीं आहे. ज्याला आस्ते आस्ते वर चढायचें आहे व पडण्यापासून स्वतःचा बचाव करून घ्यावयाचा आहे त्याच्यासाठीं कांहीं सहाय्यक होणारे नियम :—

आपण केव्हांही रिकामा रहायचें नाहीं. नेहमीं कांहीं ना कांहीं कामकाजांत गुंतून रहायचें. तें कामसुद्धां असें असावें कीं ज्यामुळें मनांत गलिच्छ विचार येणार नाहींत. उन्नतीकारक विचार मनांत सतत येत रहातील.

आपले डोळे, नाक, जिव्हा, कान वगैरे इंद्रियांस भगवंताचें दर्शन, श्रवण, मनन घडेल अशा वातावरणांत व विचारात आपला वेळ घालवावा.

मनांत रोजच्या रोज चांगले विचार यावे, सद्‌विचारांचे सतत पोषण व्हावे व त्यांची सतत वाढ होत जावी यासाठीं सत्संगतीचा लाभ घ्यावा. निदानपक्षी सद्विचारांस पोषक असे ग्रंथ वाचण्याचा परिपाठ ठेवावा.

तुमचें जें आराध्य दैवत असेल किंवा भगवंताचें जें नांव तुमच्या आवडीचें असेल; त्याचा जप सतत करावा. ध्यानीं मनीं तें नांव असावें.

कोणाचाही द्वेष करायचा नाहीं, कोणाचेंही वाईट चिंतायचें नाहीं. अशी मनाला संवय लावावी. दुसऱ्याच्या कल्याणासाठीं, दुसऱ्यास हातभार लावण्यासाठीं झटण्याची मनाला सवय लावावी. निंदा नालस्ती कोणाचीही करूं नये. दुःखी कोणीही आढळले तर त्याच्याबद्दल मनांत करुणाभाव उत्पन्न व्हावा.

आपल्यापाशीं जें कांहीं असेल तें भगवंताचें असें समजून ज्याला जरुरी असेल, जो कोणी अडचणींत असेल त्याच्यासाठीं त्याचा उपयोग करण्याकडे मनाची प्रवृत्ति असावी. तशी मनाला संवय लावावी.

ईश्वर सर्वशक्तिमान, कर्ताकरविता आहे. असें असतांही तो माझा परमसखा आहे. माझ्यासाठीं तो वाटेल तें करील या निष्ठेचें पोषण अहर्निश व्हावें. हा भगवद्भाव तुमचें सर्व पापांपासून नि मोहापासून रक्षण करील. ती भावना उपयोगी आहे. तीच तुमच्या उत्कर्षास कारण होणारी आहे.

या भावनेमुळें तुम्हीं उत्तरोत्तर वरची पायरी चढत जाल. तुम्हांला मोठ्यांत मोठा अधिकार प्राप्त होण्यापेक्षां किंवा गडगंज संपत्तीचा तुमच्यावर वर्षाव होण्यापेक्षां अथवा समजा तुमच्या वांट्यास इंद्रपद आलें तरी त्याहीपेक्षां मन सतत भगवद्भावपूर्ण रहाणें हें भारी महत्त्वाचें आहे. त्यांत जो सात्विक आनंद तो दुसऱ्या कशापासूनही तुम्हीं मिळवूं शकणार नाहीं.

—संपादक



# भगवत्कृपेवर विश्वास

## एक अध्यात्मिक कथा

उत्तर-भारतांतील ही एक श्रवणीय कथा आहे. भागिरथी नदीच्या तीरावर एक छोटासा आश्रम बांधून स्वामी ध्यानानंद हे देव देव करीत तेथें सुखानें रहात असत. आश्रम प्रथम नव्हता; परंतु जनतेनें भक्तीभावपूर्वक आश्रम बांधून स्वामीजींना सुखानें रहातां यावें यासाठीं ती सोय करून दिलेली होती. आश्रम झाला व त्याच्या मागोमाग नाना भेटी नाना प्रकारच्या वस्तु तेथें येऊन पडूं लागल्या व त्यांचा संग्रह आश्रमांत होऊं लागला. तो कमी न होतां उत्तरोत्तर वाढतच गेला. त्या आश्रमांत ठराविक वेळीं कीर्तन, प्रवचन व भजन होत असे. असंख्य लोक त्यांत प्रत्यहीं सामील होत असत. गांवांतीलच नव्हे तर पर गांवांतील लोकहि येऊन तेथें रहात असत.

एके दिवशीं त्या गावांत कोणी एक साधू-सत्पुरुष आले. त्यांच्यापाशीं काय होतें. फक्त एक झोळी! त्या झोळींत त्या ऋतूंत मिळणारी फळें भरलेलीं असत. दुसरें कांहीं नसे; गावांत आल्यानंतर प्रत्येकाच्या दरवाजासमोर क्षणभर उभे राहून 'राधाकृष्ण, राधाकृष्ण' या गोड व सुमधूर नांवाचा उच्चार ते त्रिवार करीत असत. घरांतील कोणी ना कोणी झोळींत घालण्यासाठीं भिक्षा घेऊन येत असे. परंतु त्या भिक्षेचा स्वीकार न करतां आपल्या झोळींतील एखादें फळ किंवा फूल काढून ते हातावर ठेवीत व पुढें जात.

असे ते विचित्र साधू होते! घेण्यापेक्षां देण्याकडे त्यांचें लक्ष असे!

त्या साधूकडे पहातांच कोणाच्याही अंतःकरणांत प्रेमादराची भावना निर्माण व्हावी, त्यांच्या चेहऱ्यावर सात्विक तेज विलसत होतें. चेहरा आनंदानें फुललेला होता. तेथें दुःखाला बिलकूल थारा नव्हता.

भागिरथी तटाकीं एका वृक्षछायेखालीं त्यांनी आपला मुक्काम ठोकला होता. गांवांतील असंख्य लोक तेथें दर्शनासाठीं जाऊं लागले. स्वामी ध्यानानंद यांच्याकडील माणसांची रीघ कमी कमी होऊं लागली.

स्वामीजींना मोठें आश्चर्य वाटूं लागलें. ते विचार करूं लागले कीं, या गांवांत मी गेल्या कित्येक दिवसांपासून रहात आहें. लोकांची हातून होईल ती सेवा करीत

आहे. असे असतां गांवातील लोकांना माझें आकर्षण न वाटतां नव्यानें आलेल्या कोणा साधू-सन्याशाचें एवढें आकर्षण कां बरे वाटावें ?

खरोखर विचार करण्यासारखा होता तो प्रश्न ! त्याला उत्तर कांहीं सुचेना. काय करावें ? स्वामीजी बेचैन झाले. माझी शंका निरसन त्या साधूकडूनच करून घ्यावी असें वाटून वेळ न गमवतां स्वामीजी त्या साधूच्या भेटीस गेले, कारण ते अहंकारी नव्हते. होते मोक्षार्थी, परंतु वाट चुकलेले !

ते साधूमहाराज एकांतांत असतां स्वामी त्यांच्या भेटीस गेले व त्यांना आपल्या मनांतील शंका विचारली.

साधूमहाराज म्हणाले, तुमच्या प्रश्नाचें उत्तर किंवा शंकेचें समाधान असें बोलून करतां येण्यासारखें नाहीं. मी तुम्हांला अकस्मात हांक मारीन तेव्हां तुम्हीं माझ्याबरोबर बाहेर पडायचें, म्हणजे तुमच्या प्रश्नांचें उत्तर सहज मिळेल.

थोडे दिवस निघून गेले. एके दिवशीं साधु महाराजांकडून स्वामीजींना निरोप आला व त्यांच्या आदेशाप्रमाणें स्वामीजी त्यांच्याबरोबर प्रवासास निघाले. प्रवास दाट जंगलांतून होता. कडक उन्हाळा जाणवत होता त्यामुळें तहानेनें व भुकेनें जीव व्याकूळ झाला होता.

स्वामीजींचा धीर खचला. न बोलून आतां चालणार नाहीं असें वाटून ते साधुजींना म्हणाले, " महाराज ! आतां दुपार टळत आली आहे. कुठेंतरी विश्रांति घेणें जरूर आहे असें मला वाटतें."

साधूजी म्हणाले, " तुमचे म्हणणें बरोबर आहे; परंतु मला असं म्हणायचं आहे कीं, विश्रांति किंवा खाणेपिणें या गोष्टीसाठीं मी धडपडत नाहीं. प्रभूच्या मनांत विश्रांति देण्याचे व खायला द्यायचें येईल तेव्हां तो देईल. मी सारें त्याच्यावर सोपविलें आहे. आपण धीर धरून चालू या–जरा पहा तर खरं, मी स्वतःसाठीं कोणाकडे कांहीं मागत नाहीं; भगवंताला जेव्हां मी खावेंप्यावें असे वाटते तेव्हां कुठं ना कुठें तोच सोय लावून देतो. मी सारं कांहीं त्याच्या मर्जीवर सोपवलं आहे."

बोलतां बोलतां दाट अंधकार सर्वत्र दिसूं लागला. इतक्यांत एक साधेसुधे गृहस्थ पुढें येऊन म्हणाले, " महाराज ! आज रात्रीच्या समयीं आपण कुठें निघालांत. माझें घर येथून नजिकच आहे. कृपा करून आपण उभयतांनीं माझ्याबरोबर यावें व माझें घर आपल्या आगमनानें पुण्यपावन करावें."

साधूजी म्हणाले, " ठीक आहे. जशी आपली इच्छा. आम्हांलाही विश्रांतीची जरूरी आहेच. चला तर ! "

आणि ते तिघेही थोड्याच वेळांत एका टेकडीवरील घरांत येऊन पोहोंचले.

सूर्य अस्तास गेलेला होता व सर्वत्र अंधकाराचें साम्राज्य पसरलें होतें.

साधूमहाराज स्वामीजींस उद्देशून म्हणाले, "पहा! आतां सूर्यनारायण अस्ताला गेला आहे. सर्वत्र काळोख पसरला आहे. हा अंधकार नाहींसा कोणी करूं शकेल का! तो नाहींसा केव्हां होईल? प्रकाशाचें पुनरागमन होईल तेव्हांच कीं नाहीं? भगवंताच्या कृपेवर विश्वास किंवा श्रद्धा ठेवण्याचें तसेंच आहे. भगवंतावरील विश्वास हा प्रकाश आहे. आणि कोणत्याही गोष्टीचा अभाव म्हणजे अंधकार. तो अभाव किंवा तो अंधकार दूर करण्याचें साधन म्हणजे श्रद्धा. ती आपल्या गाठीशीं असली पाहिजे. ती असली म्हणजे सारा अभाव, सारा काळोख दूर होतो. आपण भोजन केलें म्हणजे तृप्ति वाटते. परंतु ती कायम टिकते का? नाहीं. पुन्हां पुन्हां भोजन करण्याची जरूरी भासतेच कीं नाहीं? परंतु भगवंतावर श्रद्धा ठेवल्यानें जी तृप्ति मिळते व जो आनंद मिळतो त्याचा लाभ आपण करून घेतला पाहिजे."

बोलतां बोलतां साधूमहाराज एकदम स्तब्ध झाले. त्यांच्या मुखकमळावर आनंदाचा दिव्य प्रकाश झळकत होता. त्यांच्याकडे पाहून कोणाचीही तृप्ति झाली असती.

× × ×

दुसऱ्या दिवशीं पहांटेच्या प्रहरीं साधुमहाराजांनीं बिछाना सोडला. स्वामिजींना उठवून त्यांना आपल्याबरोबर निघण्याचा त्यांनीं आदेश दिला. दोघांचीहि बाहेर पडण्याची तयारी झाली.

घरमालकानें २।३ दिवस राहून विश्रांति घेण्याचा आग्रह अगदीं मनापासून केला. आणखी एखादा दिवस तरी येथें मुक्काम करावा अशी स्वामीजींची फार फार इच्छा होती. भोजन उत्तम प्रकारचें, दुधदुभतें भरपूर व थंडगार पाणी सर्व कांहीं ठीकठाक होतें. तेथें रहाण्याचा मोह कोणालाहि झाला असता.

परंतु साधुमहाराज म्हणाले, "नाहीं. येथे रहण्यांत फायदा नाहीं. आम्हांला अजून बरेंच दूर जायचें आहे. तेव्हां येथें रहाण्याच्या मोहांत पडण्यांत अर्थ नाहीं."

नंतर घरमालक म्हणाले, 'येथें वाटेंत काय मिळणार आहे. हाल होतील तुमचे! मी कांहीं फराळाचे जिन्नस बांधून देतों; तेवढे तरी घेऊन जा!"

"छे छे!! कांहीं देऊं नका. संग्रहाच्या लोभांत आम्हांला बिलकूल पाडूं नका. संग्रह करणें म्हणजे भगवंताच्या कृपेबद्दल अविश्वास प्रगट करणें! नको! नकोच तो संग्रह! फराळाच्या वस्तूंचें काय! प्रभुकृपा असली तर तो कुठेंही मिळेल."

एवढ्यावर संपलें नाहीं. साधुमहाराज व स्वामीजी पुनश्च आपल्या प्रवासासाठीं

निघाले. आतां त्यांचा प्रवास राजस्थानांतून सुरू व्हायचा होता. ज्या भागांत उन्हाळा व पाण्याचें दुर्भिक्ष अशा भागांतून !

प्रवास चालू झाला तो प्रदेश वालुकामय होता. वारा वेगानें वहात होता नि वाळूचे कण चौफेर तांडवनृत्य करीत होते व अंगभर चिकटूं लागले होते. घोटभर पाणी मिळण्याची पंचाईत. स्वामीजींचा जीव उष्माघातानें व तहानेनें व्याकूळ झाला. साधुमहाराज भगवंताचें स्मरण करीत व त्याचें नांव घेत प्रत्येक पाऊल टाकीत होते.

सायंकाळ झाली. आतां काळोखाचें राज्य सुरू होणार व प्रवास थांबविणें जरूर असें वाटूं लागतांच त्या दोघांहि प्रवाशांनी एका प्रचंड वृक्षाखालीं आपला तळ ठोकला. आसपास कोणी दिसत नव्हतें.

इतक्यांत दूर अंतरावर अंधुक प्रकाश दिसूं लागला. तो कंदिलाचा मंद प्रकाश होता. तो आस्ते, आस्ते या प्रवाशाजवळ येऊं लागला.

कोणी एक वृद्ध गृहस्थ हातांत कंदिल घेऊन त्याच्याजवळ येत होता.

तो वृद्ध गृहस्थ त्या दोघांजवळ येऊन थांबला व म्हणाला, "महाराज, आपण दूरच्या भागांतून आलेले आणि थकलेभागलेले दिसतां. आपणास भूक लागली असेल नाहीं का ? माझ्यापाशीं कांहीं पोहे, गूळ वगैरे खाद्यपदार्थ आहेत. पाणीही लोटाभर आहे. आपण या वस्तूंचा स्वीकार करावा."

त्यावेळीं जें हवें होतें तें देवकृपेनें मिळालें. कांही वेळानें तेथेंच त्यांनीं हातपाय पसरले. तो वृद्ध गृहस्थ निघून गेला. स्वामीजीना त्या भूमितलावर झोप लागली नाहीं. त्यांची तळमळ रात्रभर सुरू होती. साधूमहाराज मात्र जमिनीला अंग टेकतांच निद्रावश झाले.

पहांटेच्या प्रहरीं साधुमहाराज जागे झाले. त्यांनीं स्वामीजींना प्रेमानें हांक मारून उठविलें व आकाशाकडे बोट दाखवून म्हणाले, "किती सुंदर आहे हें दृश्य ! सूर्यनारायणाचें आगमन व्हायचें आहे. तत्पूर्वी आकाशांत सर्वत्र कसा लालीमा पसरला आहे पहा ! आकाशाचा अंतपार कोणालाहि लावतां आलेला नाहीं. तें अनन्त आहे, अखंड आहे. तो लालिमा दिसत आहे ना; तो सूर्योदयाबरोबर क्षणांत नाहींसा होईल. त्याचप्रमाणें आपल्यामध्यें अहंकार दबा धरून बसलेला आहे. तो अंतःकरणांत सूर्योदय झाल्याबरोबर क्षणभर रहाणार नाहीं. तो सूर्योदय मात्र झाला पाहिजे."

मुखमार्जन वगैरे विधि आटोपून ती जोडी पुन्हां पुढील प्रवासास निघाली.

जातां जातां वाटेंत साधूमहाराज सहज म्हणाले, "स्वामीजी! आपण विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर आपणास मिळालें का?"

स्वामीजी म्हणाले, "होय महाराज! मिळालें. मी आश्रम तयार केला. तेथें धन-धान्य आदि वस्तूंचा संग्रह केला आणि त्याचबरोबर भगवंतावरील श्रद्धेला मी पारखा झालों. मी त्या गावांत प्रवेश केला त्यावेळीं भगवंतावर माझी श्रद्धा होती. परंतु लोक मला मानूं लागले, धनधान्य आणून देऊं लागले. लोभ वाढत गेला. भगवंताचें विस्मरण होत गेलें. लोकांच्या जंजाळांत सांपडलों. माझ्या मागे आश्रम चालू राहिला पाहिजे, त्यासाठीं धनदौलत पाहिजे म्हणून तिचा संग्रह करूं लागलो. आश्रम बंद झाला तर कसें होईल? ही होती माझी चिंता. परंतु त्यामुळें झालें काय? भगवंताला मी पारखा झालों. त्याच्यावरील विश्वास मी दूर झुगारून दिला. आतां यापुढें जें कांहीं जवळ केलें आहे तें सारें गोरगरिबांस वाटून मी मोकळा होईन आणि सर्वस्वी भगवंतावर श्रद्धा ठेवून, राहिलेलें आयुष्य सेवेंत घालवीन."

शेवटीं साधुमहाराज म्हणाले, "स्वामीजी! मला लोकांनीं मानावें, माझा मानसन्मान करावा असें म्हटल्यानें मानसन्मान मिळत नसतो. दीन दुबळयांची, अनाथांची, गरजवंतांची सेवा केल्यानें मानसन्मान आपोआप आपल्याकडे चालून येत असतो. हें सर्व करीत असतां भगवंतावर आपली दृढ श्रद्धा पाहिजे. तोच कर्ता करविता; मी कोणी नाहीं. ही भावना आपल्या अंतःकरणांत खोल रुजली पाहिजे."

हा अध्यात्मिक प्रवास होता. स्वामीजींना जागे करायचें होतें. ते जागे झाले.


नंतर परतीचा प्रवास सुरू झाला. साधूमहाराज स्वामीजींचा आश्रम असलेल्या गांवाच्या सीमेपर्यंत त्यांना पोंचवायला आले व पुन्हां कधीं ना कधीं भेट होईल असें आश्वासन देऊन त्यांनीं आशीर्वादपूर्वक स्वामीजींचा निरोप घेतला.

स्वामीजींनी गावी येऊन काय केलें? आश्रमांतील सर्व चीजवस्तु, धनधान्य गरजवंतांस वाटून टाकिलें व ज्याला घरदार नव्हतें अशा एका कुटुंबास आश्रम देऊन ते सर्वतोपरी मुक्त झाले.

स्वामीजी सर्वांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन वृंदावनास गेले. त्यांचा आतां नवा जन्म झालेला होता.

---

('कल्याण'मधील एका हिंदी कथेच्या आधारें—साभार)



# मनात आलं कीं—

लेखक : द्. शं. टिपणीस

१. गुपित चोरून ऐकण्याची उत्सुकता माणसाला फार. शेजारी काय चाललें आहे याच्या उठाठेवी करणारी मंडळी फार. भिंतीला कान असतात असें म्हणतात. तसें पाहिलें तर उत्सुकता ( Curiosity ) हा मोलाचा अध्यात्मिक गुण आहे. अज्ञानांत डोकावण्याची उपजत उत्सुकता माणसाच्या ठिकाणीं आहे. बरेचजण नको त्यांत डोकावतात व भांडणें व कलागती निर्माण होतात. संत व शास्त्रज्ञ हेही अज्ञानांत सारखे डोकावीत असतात. परिणाम मात्र जगाचें कल्याण होऊन तें सुखी होते.

२. ज्याला मुळींच अहंकार नाहीं तो स्वाभिमानशून्य कर्तृत्वहीन व शेळपट होय, ज्याला अहंकार आहे तो हुकूमशहा व स्वार्थानें बरबटलेला होय. ज्याला आहे व नाहीं तोच खरा मानव. संत असेच असतात.

३. सिनेमा वा नाटकाला खात्रीलायक जागा मिळावी म्हणून आपण अॅडव्हांस बुकिंग करतो. मग देवाच्या राज्यांत खात्रीलायक जागा मिळावी म्हणून पुण्याईचें व नामस्मरणाचें मोल देऊन आपण अॅडव्हांस बुकिंग कां करूं नये ! आयत्यावेळीं बडाबुकी करण्यांत व निराश होण्यांत काय शहाणपणा !

४. पुरणपोळी आयत्या वेळीं करून ताजी खाल्ली तर खुमासदार व रुचकर लागते. पण लोणचें ! तें जितकें मुरेल तितकें स्वादिष्ठ व चवदार होत जाते. नामस्मरण असेंच आहे. जितके मुरेल तितके त्याचें सामर्थ्य अधिक होत जाते. वर्षानुवर्षें तें जीवनांत मुरत ठेवलें तर अंतीं जीवन चवदार होते.

५. योगसाधन करणारा फक्त एकाचें म्हणजे स्वतःचें समाधान करूं शकतो. भक्त स्वतःबरोबर इतरांचेही समाधान करूं शकतो. गोष्ट आहे ना ! ज्ञानदेव विहिरींतील पाणी दोनचार लोकांना देऊं शकला असता. पण नामदेव आपल्या भक्तिमुळें स्वतः-बरोबर अनेकांची, अनेक खेड्यांतील खेडुतांची नव्हे आजुबाजूच्या झाडांझुडपांचीही तहान भागवूं शकला. अजून ती विहीर साक्ष आहे. हा भक्तीचा महिमा.

६. वेलीला जसा वृक्षाचा आधार तसा मायेला ब्रह्माचा आधार. म्हणून हा मायेचा दृश्य पसारा टिकून आहे.

७. आग लागली कीं अग्निशामक दलाला आपण बोलावतो. आग थंड होते. संकटे व हालअपेष्टांचा डोंब शांत करायला नामसंकीर्तन हें उत्तम अग्निशामक आहे.

८. सत्य हें शुद्ध सोन्यासारखे आहे. शुद्ध सोन्याचे दागिने घडत नाहींत. त्यांत थोडें तांबें मिसळावें लागतें. सत्यांत मायेची मिसळ होते तेव्हां दृश्य जग व त्यांतील व्यवहार घडूं शकतात.

९. लाटाशिवाय सागर नाहीं, संकटाशिवाय संसार नाहीं. संसार करणें सागरांतील लाटांवर पोहण्यासारखे आहे. पोहणारा वरखालीं हेलकावे खाणारच. संसारांतील हालअपेष्टा संकटे यांच्या लाटा तरून जाईल तोच खरा पट्टीचा पोहणारा.

१०. एक माणूस कांद्याच्या आंत काय आहे हें पहाण्यासाठीं कांदा सोलीत बसला. सालपटामागून सालपटे काढतां काढतां सर्व कांदा सोलून झाला व अंतीं अवकाशाखेरीज कांहींच हातीं लागले नाहीं. हा दृश्य पसारा असाच आहे. बुद्धिनें एक एक पापुद्रा उकलीत राहिलें तर शेवटीं कांहींच नाहीं असें अनुभवास येते.

११. एका ज्योतीच्या स्पर्शानें दुसरी ज्योत पेटूं शकते. पण त्या दिव्यांत तेल वात अगोदर असली पाहिजे. आत्मज्ञानाच्या तळमळीनें तेल शुद्ध चित्ताची वात असली तर संत नुसत्या स्पर्शानें आत्मज्ञानाचा नंदादीप शिष्याच्या ठिकाणीं उजळू शकतात. नसली तर अगोदर संतांना ती दिव्यांत भरावी लागतात. म्हणून संत संगती अवश्य आहे.

१२. पुंडलीकासाठीं अजुनि तिष्ठत. एवढा पांडुरंग पुंडलीकावर खुष. पांडुरंगाच्या पंगतीला बसला आहे. देवानें आपलें देवपण त्याला देऊन टाकलें. कां ? देवाकडे दुर्लक्ष केले म्हणून ? आपल्याकडे एखादा पाहुणा आला तर आपण या या करून हातांतील काम टाकून त्याला सामोरे जातो आणि देव आला तर ? तर आपण उठून धावत जाऊन त्याला हात धरून आंत घेऊन येऊं. आपली अधीरता व पुंडलीकाचा शांतपणा. तुलना करून पहावी. कर्तव्य निष्ठा हीच ईश्वर निष्ठा ही पुंडलीकाची भावना. आई-वडीलांच्या सेवेसारखी देवाला मान्य होणारी उत्कृष्ट भक्ति नाहीं हें विठोबानें दाखवून दिले. म्हाताऱ्या अपंग आईवडीलांची सेवा कर्तव्य निष्ठेनें न त्रासतां करणे हा ईश्वर भक्तीचा एक उत्कृष्ट मार्ग आहे. वास्तव तरुणांनीं पुंडलीकाचा आदर्श पुढें ठेवावा असें सांगतात. पण पुंडलीकाची एवढी निष्ठा कां होती ? त्याचें आईवडील कसें वागत याची कुठेंच नोंद नाहीं. निदान कोणी तें सांगत नाहीं. ते कळेल व त्यांचा आदर्श आजचें आईवडील ठेवतील तर आजचें तरुणही पुंडलीकाला गुरु मानतील. आपल्यासाठीं जीव लावायला आपणही दुसऱ्यासाठीं जीव लावला पाहिजे. म्हातारपण व तारुण्य यामधील तफावत दोघांनीहि ओळखली पाहिजे.

---

# आत्मानुभवाचें स्वरूप

## वेगवेगळ्या दृष्टींचा विचार

—गुरुदेव रानडे

आपणांस आतां एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचा येथें संक्षेपतः विचार करावयाचा आहे. आध्यात्मिक अनुभव सत्य आहे यास प्रमाण काय? कोणत्या निकषावर घांसून तो खरा असल्याचें ठरवावयाचें? या निकषापासून निघणाऱ्या सर्व तात्त्विक अनुमानांचा जरी येथें विचार करतां आला नाहीं, तरी आध्यात्मिक जीवनांत कोणत्या बाबतींत त्याचा प्रत्यक्ष उपयोग आहे, याचा तरी थोडक्यांत विचार करूं. पौर्वात्य व पाश्चात्य सर्व संतांच्या संकलित अनुभवावरून आपल्यास असें म्हणतां येईल कीं, आध्यात्मिक व पारमार्थिक अनुभवांत एक प्रकारचें सर्वगतत्त्व असतें. ईश्वराचें नामस्मरण, भक्तीची तीव्रता, आत्मानुभवाचें स्वरूप इत्यादिकांविषयीं सर्व संतांची शिकवणुक एकच आहे. व कांहीं लोक आपल्या देशाचे, धर्माचे किंवा पंथाचे संत इतर देशांच्या, धर्मांच्या वा पंथांच्या संतांपेक्षां भिन्न किंवा श्रेष्ठ आहेत असें मानितात, हा केवळ घमेंडखोरपणा होय. देवासमोर सर्व मानव एक आहेत. जर सर्व मानवांना देवपण मिळण्याची एकच प्रकारची शक्ति देवानें दिली आहे व त्या शक्तीमुळें त्यांस देवास समोरासमोर पाहतां येतें. हें सर्व जर खरें आहे, तर कांहीं संतांच्या आत्मानुभवाची योग्यता इतरांच्यापेक्षां श्रेष्ठ आहे, असें म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. संतांमध्यें शारीरिक, मानसिक किंवा स्वभावजन्य फरक असणें साहजिक आहे. परन्तु, त्यामुळें त्यांच्या अनुभवाचें स्वरूप बदलतें असें मानणें चुकीचें होईल. या सर्वगतत्वामुळें आध्यात्मिक अनुभव वस्तुनिष्ठ, आवश्यक, व सयुक्तिक ठरतो, असें जर्मन तत्त्वज्ञ कांट यांचें मत आहे. अध्यात्मांत उच्चतम मूल्य व अंतिम सत्य लाभतें, म्हणून त्यांचें प्रमाणहि तितकेंच प्रबल असलें पाहिजे, असें सर हेन्री जोन्सनें आपल्या 'डोळस श्रद्धा' या ग्रंथांत प्रतिपादिलें आहे. आध्यात्मिक अनुभवाची वस्तुनिष्ठता व आवश्यकता इतर कोणत्याहि मानवी अनुभवांपेक्षां उच्च दर्जाची आहे असें आम्हांस वाटतें. कारण आत्मानुभव दैवी आहे. या दैवी अंशामुळेंच हा अनुभव इतका बलवत्तर व प्रभावी ठरतो.

## बौद्धिक दृष्टि

या आत्मानुभवाच्या निकषाचा दुसऱ्या एका बाजूनें विचार करतां येईल. आध्यात्मिक जीवनांत बुद्धि, भावना व क्रियाशक्ति या सर्वांच्या व्यापारास पूर्ण वाव आहे. याशिवाय एक अतींद्रिय शक्तीदेखील उपयोगांत आणावी लागते. या शक्तीमुळें अंतीम सत्याचें तत्क्षणीं परोक्षज्ञान प्राप्त होतें. ज्या अनुभूतीनें चिकित्सा-शक्ति बळावून विचार जास्त स्पष्ट होत नाहीत, ती अनुभूति निरुपयोगी आहे, असें त्यास म्हणावें लागेल. ज्याच्या मनांत विचारांचा गोंधळ माजलेला असतो, किंवा ज्यास भ्रम झाला आहे, किंवा ज्यास बुद्धिभ्रंश झाल्यामुळें विपरीत गोष्टी दिसतात, किंवा ज्याच्या मेंदूंत व ज्ञानतंतूंमध्यें विकृति झाली आहे, अशा मनुष्यास खरा आध्यात्मिक अनुभव कधींच प्राप्त होणार नाहीं. आत्मज्ञाची कल्पनाशक्ति जबरदस्ती असावी लागते. त्याची बुद्धि कुशाग्र व व्यापक अचूक व स्थिर असली पाहिजे. श्रीशंकराचार्य, श्रीयाज्ञवल्क्य, स्पिनोझा, प्लॅटिनस, आगास्टस्, संत पॉल, किंवा श्रीज्ञानेश्वर यांसारख्या संतश्रेष्ठांनीं जे ग्रंथ लिहिले, ते उच्च दर्जाचे व अमर ठरले. कारण ते अत्यंत बुद्धिमान् व प्रतिभासंपन्न होते. एका अर्थी हे ग्रंथ अमर राहतील. जोंपर्यंत आत्मज्ञांच्या अंतरंगीय अनुभूतीची कदर जगांतील लोकांस वाटते, तोंपर्यंत हे ग्रंथ अविनाशी ठरतील, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. इतर गोष्टींबरोबरच अचूक तार्किक विचार हें एक खऱ्या अनुभूतीचे लक्षण आहे. तात्त्विकदृष्ट्या अशा विचाराबद्दल लोकांना जरूर वाटतें. व्यक्ती तितक्या प्रकृती हें संतांच्या बाबतींतहि खरें आहे. त्यांच्यामध्येंहि स्वभावभेद राहतातच. असे स्वभाव-भेद सामान्य माणसांमध्येंहि आढळतात. सर्वच आत्मज्ञ कांहीं तत्त्वज्ञानी वा भावना-प्रधान, अथवा कर्मनिष्ठ नसतात. परंतु जेथें खरी अनुभूति आहे, तेथें यापैकीं एखाद्या शक्तीचे प्राधान्य असतें व यापैकीं निदान एखाद्या तरी शक्तीचा पूर्ण विकास व आविष्कार ज्या आत्मज्ञामध्यें दिसून येत नाहीं, तो खरा आत्मज्ञच नव्हे असें निश्चित म्हणतां येईल. म्हणून तीव्र बुद्धिमत्ता व स्पष्ट विचार हे आत्मानुभवाचे पहिल्या दर्जाचे निकष आहेत असें दिसतें.

## भावनात्मक दृष्टि

अनुभूति व भावनाप्रधान जीवन यांचा परस्पर कांहींच संबंध नाहीं, असें कांहीं ग्रंथकार प्रतिपादतात. आतां भावनाप्रधान जीवन याचा अर्थ ग्रंथकारांच्या दृष्टीनें ‘उदास व उद्विग्न जीवन,’ किंवा ‘उथळ व उत्तान भावनांचा खळखळाट,’ असा असेल, तर त्यांचें मत आम्हांस मान्य आहे. परंतु शुद्ध, उदात्त व दैवी भावनाहि आत्मज्ञांच्या अंतःकरणांत उद्भवतां कामा नये,

व त्यांनीं त्यांचा उपयोग परमार्थाकडेहि करतां कामा नये, असा जर या ग्रथकारांचा मथितार्थ असेल, तर मात्र आमचा त्यांच्याशीं पूर्ण विरोध आहे. वस्तुतः श्रीतुकाराम व श्रीएकनाथ यांनीं दिलेलें सद्भावनांचें वर्णन वाचण्याची वाचक तसदी घेतील, तर भावनाप्रधानता अनुभूतीस अत्यंत आवश्यक आहे, अशी त्यांची खात्री होईल. उलट, अत्यंत शुद्ध व पवित्र भावनांची समृद्धि असल्याशिवाय व त्या सर्व भावना ईश्वराकडे लावल्याशिवाय आत्मानुभव शक्यच नाहीं. म्हणून परमार्थी जीवन म्हणजे भावनांचाच अभाव नव्हे, तर तें उच्च भावनांनीं परिपूर्ण असतें असें म्हणावें लागतें. मात्र या भावना बुद्धीच्या स्वाधीन असाव्या लागतात व त्यांचा उपयोगहि बुद्धीच्या साहाय्यानें करावा लागतो. नाहींतर आत्मज्ञ केवळ निराशावादी किंवा उथळ भावनाप्रधान बनतो. श्रीएकनाथांनीं भावनांच्या मानसशास्त्रांत विशेष व स्वतंत्र भर टाकली आहे. तिचा अनुभूतिशास्त्राच्या प्रत्येक अभ्यासूनें सूक्ष्म अभ्यास केला पाहिजे. 'भावना उदात्त करून बुद्धियुक्त अंतःकरणानें ईश्वरावर प्रेम केलें पाहिजे.' असें स्पिनोझानें म्हटलें आहे. खऱ्या आध्यात्मिक जीवनास अत्यंत आवश्यक गोष्ट कोणती हें त्यानें येथें अचूकपणें सांगितलें आहे.

## नैतिक दृष्टि

आध्यात्मिक अनुभवाची सत्यता पटविणारें आणखी एक प्रमाण म्हणजे या अनुभवानें व्यक्तीचा व समाजाचा नैतिक विकास निश्चितपणें झाला पाहिजे. या शास्त्रानें मनुष्य नीतीच्या मूल्यास महत्त्व देईनासा होतो, किंवा निष्क्रिय बनण्याकडे त्याची प्रवृत्ति होते असें अध्यात्मशास्त्राच्या टीकाकारांचें म्हणणें आहे. अनुभुतिशास्त्राविषयीं ज्यांची सहानुभूति असते अशीं दर्शनें नीतिशास्त्रदृष्ट्या एकंदरींत कमी प्रतीचीं असतात, असें डीन इंजचें म्हणणें आहे. याचें उदाहरण म्हणून त्यानें पौर्वात्य विश्वदेवतावादाकडे बोट दाखविलें आहे. हें दर्शन जणुं एका निराळ्या स्वतंत्र वर्गांत पडतें ! या दर्शनकाराच्या मतें सर्वच वस्तू सारख्याच देवतारूप आहेत. यामुळें चांगलें व वाईट यांतील भेदच नाहींसा होतो, असें डीन साहेबांचें म्हणणें आहे. अशा प्रकारच्या अनुभुतिशास्त्रांत दोन ढोबळ दोष दिसतात, असें त्यांचें म्हणणें : एक म्हणजे परस्परविरोधवाद व दुसरा म्हणजे निष्क्रिय शांततावाद. पहिल्या मताप्रमाणें आत्मज्ञ देवाच्या आज्ञेप्रमाणें वागत असल्यामुळें त्याच्याकडून अनैतिक कर्म घडणें शक्य नाहीं व देहानें केलेलीं पापें आत्म्यास लागत नाहींत. शांतिवादाच्या मतें साधकानें हात जोडून स्वस्थ बसावें व जी परिस्थिति प्राप्त होईल तिच्यांत समाधान मानावें ही टीका डीन इंजसारख्या आत्मानुभवाविषयीं सहानुभूति असलेल्या लेखकानें करावी हें अत्यंत आश्चर्यकारक आहे. डीन इंजसारखा एखादा खरा मुमुक्षु जेव्हां अनुभु-

तीनें नैतिक प्रवृत्ति मृतप्राय होते असें म्हणतो, तेव्हां कांचेच्या घरांत रहाणाऱ्यानें त्यावर आपण होऊन दगड फेकावे त्याप्रमाणें त्याचें विधान त्याच्याच मतास अपकारक ठरतें हें उघड आहे. वस्तुतः खरें पारमार्थिक जीवन व्यक्तीच्या नैतिक विकासास पोषक व समाजजीवनास पूर्ण कल्याणकारक ठरतें. श्रीज्ञानेश्वरांनीं विविध सद्गुणांचें जें सूक्ष्म व अचूक पृथक्करण केलें आहे, त्याकडे पाहिल्यास जगांतल्या नितिविषयक वाङ्मयांत वरील वर्णनाइतकें सुंदर वर्णन क्वचितच सांपडेल, असें म्हणावें लागतें. पूर्ण व सुंदर पृथक्करण, विचारांचा स्पष्टपणा व अचूक चित्रण, या सर्व दृष्टींनी हें वर्णन अद्वितीय आहे. श्रीज्ञानेश्वरासारखे आत्मज्ञ इतक्या अट्टाहासानें सद्गुणांची आवश्यकता प्रतिपादीत असतां, "अनुभूतिशास्त्रामुळें नीति व अनीति यांतील फरक नाहींसा होतो" असें म्हणणें धाडसाचें होईल. पारमार्थिक जीवनांत नैतिक सद्गुण पूर्णपणें संपादिले पाहिजेत, असा प्लॉटिनसचाहि आग्रह दिसतो. "परमेश्वर—दर्शन निष्फळ आहे असें मुळीं मानूं नये. या स्थितींत आत्मा, प्रत्यक्ष देवाप्रमाणें सुंदर विचार व सुंदर सद्गुण निर्माण करतो" परमेश्वराचें ध्यान केलें असतां, शांति, समता यांचीं गोड फळें आत्म्यास प्राप्त होतात, असें संत टेरेसाचें मत आहे. "विशेषतः त्यास तीन प्रकारें ईश्वरी कृपाप्रसाद मिळतो. प्रथम, ईश्वराचा महिमा दृग्गोचर होतो व तो जितक्या जास्त प्रमाणांत पाहतो, तितका तो जास्त प्रतीत होतो. अत्यंत श्रेष्ठ अशा सृष्टि—कर्त्यानें एवढे चमत्कार करून दाखविले, त्यापुढें आपण किती क्षुद्र कीटक आहों, आपल्या गत आयुष्यांत त्याचा आम्ही कसा अपमान व उपमर्द केला, व तरी आतां त्याच्याकडे कसे टक लावून पाहूं शकतों, इत्यादि विचारांनीं जीवात्म्याच्या अंगीं आत्मज्ञान बाणतें अन् लीनता प्राप्त होते. तिसरा प्रसाद म्हणजे जगांतील सर्व गोष्टी जर श्रेष्ठ ईश्वराच्या चरणीं समर्पण केल्या नाहींत, तर त्याबद्दल अत्यंत तिरस्कार वाटणें" 'खऱ्या पारमार्थिक जीवनांत ईश्वराच्या स्पर्शामुळें ईश्वराचें ज्ञान व सद्गुण साधकाच्या बुद्धींत शिरतात व त्यामुळें जीवात्म्यास ईश्वराच्या ज्ञानाची, कृपेची, देणग्यांची व शक्तींची जाणीव होते आणि त्यामुळें जीव अत्यंत सुंदर व समर्थ होतो.' ईश्वराच्या ध्यानानें साधकास प्राप्त होणाऱ्या सद्गुणांचें वर्णन श्रीरामदासांनींदेखील याचप्रमाणें केलें आहे. आत्मज्ञानाचा समाजास काय उपयोग? या प्रश्नाचें एवढेंच उत्तर देतां येईल कीं, जो संत समाजास नितांत उपयोगी पडत नाहीं तो खरा संतच नव्हे, हें एक सामान्य सत्य आहे. अर्थात संतांमध्यें देखील स्वभावविशेष असतात. कांहीं शांतताप्रिय, तर कांहीं कर्मनिष्ठ असतात. परंतु कोणत्याहि परिस्थितींत संत देवाच्या दर्शनाकडे व त्याच्या मोठेपणाकडे लोकांचें लक्ष क्षणोक्षणीं वेधतात आणि ते याप्रमाणें मानव्यास अत्यंत उपकारक ठरतात, ही गोष्ट अगदीं खरी आहे. "टॉमस् ए कँपिस्

द्वैतवाद प्रतिपादतो म्हणून तो 'आत्मज्ञ' या पदवीस पात्र नाहीं " हें डीन इंजचें विधान चुकीचें आहे, असें आम्हांस वाटतें. जगांत असे कांहीं महान् संत होऊन गेले आहेत कीं, ज्यांनीं अरिस्टॉटलच्या देवाप्रमाणें आपण अ–चल राहून ईश्वरध्यानाच्या साह्यानें सर्व जग हलविलें आहे. अशा संतांस एका मानसशास्त्रज्ञानें 'जगास हलवून जागृत करणारे पुरुष' म्हटलें आहे. इमेशियस् अशा प्रकारचे संत होते. "ते म्हणजे खरोखर मानवी व्यवहारास चालना देणारे जगांतील सर्वांत जबरदस्त एंजिन् होते." असें प्रो. जेम्सनें त्यांचें वर्णन केलें आहे. "सेंट टेरेसानें पारमार्थिक शक्तीचें एक नवें केंद्र बनविलें, यापेक्षां जास्त श्रेष्ठ सत्यकथन जगाच्या वाङ्मयांत इतरत्र कोठें सांपडतें?" असा रोखठोक सवाल प्रो. जेम्स विचारतात. ज्यांच्यावर देवाची कृपा होते व त्यांच्या कृपेनें ज्यांना आत्मानुभव येतो, त्यांना एवढें निश्चित ज्ञान होतें कीं, आपल्या अंतःकरणांत प्रतीत होणारी वस्तु काय आहे, हें त्यांना कळलें नाहीं, तरी ती आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहे हें त्यांना निश्चित कळतें. त्यांना जें वाटतें व जें बोलतात, त्यावरून त्यांना प्रेरणा देणारें तत्त्व त्यांच्यापेक्षां उच्च असून त्याविषयीं कांहीं थोडी कल्पना त्यांना असते." 'उन्नत व जास्त श्रेष्ठ अशा जीवनाची लाट आत्मज्ञाच्या अंतःकरणांत घुसते' असें रूफस् जोन्स यांचें म्हणणें आहे. "कित्येक वेळां आत्मज्ञांना असा अनुभव येतो कीं, आपण एक दार उघडून जीवनाच्या जास्त विस्तीर्ण अशा दालनांत प्रवेश करीत आहों व आपली शक्ति अनंतपटीनें वाढली आहे. नेहमीं त्यांचा हा अनुभव निरतिशय व दिव्य आनंदाचा असतो. वस्तुतः मानवाला अनुभवतां येईल असा हा पराकाष्ठेचा आनंद असतो. हा आनंद उपभोगण्याचें सामर्थ्य देखील कोठून तरी त्यांना मिळतें. सर्व विश्वाचा या अनुभवास पाठिंबा असतो." या ग्रंथांत पुढें ज्यांच्याविषयीं चर्चा होणार आहे अशा संतांमध्ये श्रीरामदास हे कर्मयोगी आहेत हें पुढें दिसून येईलच व त्यांच्या उदाहरणावरून देवाचें अखंड ध्यान केल्यानें आत्मज्ञामध्यें जगाचें कल्याण करण्याची किती प्रचंड शक्ति प्राप्त होते हें सहज दिसून येईल.



# संत कथामृत गोड

## तुकोबारायांचा सन्मान

एक दिवस तुकाराम महाराज दुपारच्या वेळीं बाहेरून घराकडे येत होते. घराजवळ आल्यावर त्यांना घरासमोर नेहमीपेक्षां निराळ्याच प्रकारची धांदल दिसली! दारांत दरबारी हुजरे मोठमोठीं तबकें घेऊन हजर असलेले दिसत होते. कुणा तबकांत भरजरी कपडे, लुगडीं होतीं, तर कुणांत चांदीसोन्याचे दागिने होते. कशांत फळफळावळें होतीं तर कशांत मेवा-मिठाई! घराबाहेर अंगणांत घोडे होते. उत्तम सजवलेली पालखीहि तिथें होती.

हें सारें पाहून तुकाराम महाराजांना एकदां वाटलें, आपण घर तर चुकलों नाहीं! घराजवळ आल्यावर भालदार, चोपदार आणि हुजऱ्यांनीं महाराजांना लवून मुजरा केला. तुकारामांनीं ह्या सगळ्या थाटाकडे साश्चर्य पाहून विचारलें, "ही भानगड कसली?"

"महाराज, शिवरायांनीं आपल्याकरितां हें सर्व पाठवलें आहे. हें सारें तुमच्या स्वाधीन करून परतण्याचा आम्हांला हुकूम आहे. शिवराय आपल्या भेटीसाठीं सवडीनें येणारहि आहेत. परंतु आज हें आपल्या..."—सर्व जामानिमा घेऊन आले त्यांचा सरदार नम्रपणें सगळी हकीकत महाराजांना सांगत होता.

तुकोबांनीं त्याला मधेंच थांबवून म्हटलें, "पण हें सारें घेऊन मी करूं काय! विठ्ठलाच्या कृपेनें आमच्या इथें विपुल शब्द-शस्त्रें आणि शब्द-रत्नें आहेत. सुकाळ आहे आमच्याकडे! कशाची ददात नाहीं! तुम्ही हें सारें परत न्या."

"शिवबा काय म्हणतील आम्हांला?"

तुकोबाराय म्हणाले—"तुम्ही त्यांना सांगा. म्हणावं, 'मी शिवरायांच्या प्रेमानें न्हाऊन निघालों आहे. हेंच त्यांचें प्रेम गरिबावर अखंड राहो.' ह्या दिवट्या, छत्री, घोडे, पालख्या स्वीकारायला लावून मला नको संकटांत टाकूं. तुम्ही न्या हें सारें परत."

"ह्यांतील कांहीं तरी ठेवून घ्या. घरच्या मुलामंडळींना ह्याचा उपयोग होईल." सरदारानें एक मार्ग काढला!

"कृपा करून तुम्हीं हें सारेंच परत न्या पाहूं. यांतली एकहि वस्तु घरीं राहिली तरी मला झोंप नाहीं येणार"—महाराजांनीं हात जोडून पुन्हां विनाविलें.

शेवटीं तो सारा लवाजमा आला तसा परत गेला !

शिवबांनीं तुकोबांचा सत्कार करायचें ठरविलें होतें. परंतु त्या मान–सन्मानाला ते बळी पडले नाहींत !

तुकाराम महाराज विठ्ठलभक्त होते. त्यांची ती भक्ति पाहून शिवराय तुकोबांच्यावर प्रसन्न झाले होते. परन्तु ही प्रसन्नता म्हणजे देवानें आपल्याला दूर सारण्यासाठीं देऊ केलेली चिरिमिरी होय असें तुकोबाना वाटलें. ते आपल्या भक्तीच्या आड येणारी कोणतीहि गोष्ट सहन करीत नसत. त्यांनीं एका अभंगांत म्हटलें—देवा, तुला मोठी वाईट खोड लागली आहे रे ! चिरिमिरी देऊन माझी ब्याद तूं घालवूं पाहात होतास नाहीं ? पण मी कांहीं कच्चा नाहीं. तुझे पायच घट्ट धरून ठेवीन. मला इतर कांहींहि नको.”

आपल्या ध्येयाआड येणारी कोणतीहि आकर्षक वस्तु वेळींच दूर लोटावी लागते नाहीं तर पुढचीं पाउलें चुकतात.

## रामदासांच्या पाठीवर ऊंस

एकदां रामदासस्वामी आपल्या शिष्यांसह कुठेंतरी चालले होते. वाटेंत चांगले चांगले मळे लागले. एका मळ्यांत ऊंस होते. ऊंस पाहिल्यावर शिष्यांच्या जिभेला पाणी सुटले. त्यांनीं रामदासस्वामींची नजर चुकवून मळ्यांतून ऊंस चोरून आणले व खाल्ले.

त्या वाडीच्या मालकाला हें कळलें. तो तावातावानें ह्या मंडळीकडे आला. तिथें त्याला कांहीं शिष्यमंडळी व एक दाढीवाला गोसावडा दिसला. रागाच्या भरांत तो अद्वातद्वा त्या गोसाव्याला बोलला. ह्यानेंच शिष्यांना फुसलावून दिलें असणार असें त्याला वाटलें. त्यानें रागाच्या भरांत तिथेंच खाण्यासाठीं पडलेला ऊस उचलला व रामदासस्वामींच्या पाठीवर हाणला !

पुढें ह्या वाडीच्या मालकानें रामदासस्वामींना उसानें मारल्याचें शिवाजी महाराजांना कळलें. रामदासस्वामी शिवाजींचे गुरु ! इकडे त्या वाडीच्या मालकालाहि माहीत झालें कीं, ज्याला आपण मारलें तो साधासुधा ‘गोसावडा, दरवेशी’ नव्हता तर छत्रपतींचा तो गुरु होता ! आतां त्यानें करावें काय ?

त्या मळ्याच्या मालकाच्या तोंडचें पाणी पळालें. तो रामदास स्वामीकडे आला. गयावया करूं लागला. पुढें शिवाजी महाराजांनीं विचारणा केली. त्यावेळीं स्वामींनीं त्यांना म्हटलें, “त्या मारणाऱ्याला जमीन इनाम द्या. त्याची त्यांत कांहीं चूक नाहीं.” आणि मग आपल्या शिष्याकडे वळून स्वामी म्हणाले, “कारे, ऊंस तुमच्या गेला पोटांत आणि माझ्या बसला पाठीवर ! एकूण एकच नाहीं कां ?

## दृष्टि तशी सृष्टि

एकदां रामदासस्वामी रामायण लिहीत होते आणि तें आपल्या शिष्यांना वाचून दाखवित होते. मारुति तें रामायण ऐकायला गुप्तरूपानें तिथें येऊन बसत असे, समर्थांनीं आपल्या रामायणांत लिहिले होतें—

"मारुति अशोकवनांत गेला तिथें पांढरी फुलें पाहिली."

हें ऐकतांच मारुति प्रकट झाला आणि म्हणाला, "मी पांढरीं फुलें मुळींच पाहिलीं नाहींत. मीं पाहिलेलीं फुलें लाल लाल होतीं. तुम्हीं चुकीचें लिहिलें आहे. तें शुद्ध करा!"

समर्थ म्हणाले, "मी लिहिलें आहे तें बरोबर आहे. तूं पांढरींच फुलें पाहिलींस."

मारुति म्हणाला, "स्वामी, मी स्वतः तेथें गेलों होतों ना? मी सांगणारा का खोटा?"

शेवटीं तक्रार रामरायाकडे गेली, रामचंद्र म्हणाले, "फुलें पांढरींच होतीं. परंतु मारुतीचे डोळे त्यावेळेस रागानें लाल झालेले होते म्हणून तीं शुभ्र फुलें त्याला लाल दिसलीं."

जगांत बिघाड नाहीं. जो आहे तो आपल्या दृष्टींत आहे.

## महाराष्ट्राची लाज राखणारे भानुदास

पूर्वी पंढरपूर मुसलमानांच्या राज्यांत होतें. त्या धामधुमीच्या काळांत पंढरपुरला विठ्ठलाची मूर्ति सुरक्षित राहील असे न वाटल्यावरून विजयनगरचा धर्मनिष्ठ राजा कृष्णराजनें ती विठ्ठलमूर्ति विजयनगरला आणून ठेवली होती. त्यानें हें सर्व सद्भावनेनेंच केलें होते. परन्तु मूर्तीच्या रक्षणासाठीं सेना ठेवावी वा भक्तांनीं प्राणार्पण करावें ही गोष्ट कांहीं घडली नव्हती. यासारखी भक्तीला लांछन लावणारी गोष्ट आणिक कोणती असूं शकणार!

पुढें पन्नास वर्षांनीं एकनाथ महाराजांचे पणजे भानुदास ह्यांनीं ती मूर्ति तिथून परत आणून पंढरपूरला स्थापायची महान कामगिरी केली. भानुदास मोठे ईश्वरभक्त होते. ते आपल्या दिंडीसह वियजनगरला गेले. त्यांच्या भक्तीनें राजा कृष्णराज संतुष्ट झाला. त्याला मूर्तीच्या सुरक्षिततेची खातरजमा झाली, तेव्हां त्याला ती विठ्ठलमूर्ति भानुदासांच्या हवालीं करावीच लागली. ही मूर्ति घेतल्याशिवाय परतायचेंच नाहीं असा भानुदासांचा निश्चयच होता. त्यासाठीं विजयनगरला कांहीं काळ त्यांना थांबावेंहि लागले. भानुदासांची ही फार मोठी कामगिरी आहे.

एकनाथांच्या मनावर ह्या गोष्टीचा फार मोठा ठसा उमटला. ह्या गोष्टीचा नाथांनीं आपल्या अभंगांत उल्लेख केला आहे.

भानुदास वयाच्या पासष्टाव्या वर्षी वारले.

**'चांगदेव पासष्टी'ची जन्म-कथा**

एकदां ज्ञानदेवांकडे चांगदेवानें एक पत्र पाठविलें. कोऱ्या कागदाचेंच तें पत्र होतें. चांगदेवापेक्षां ज्ञानदेव वयानें लहान होते. पत्राच्या मायन्यांत 'चिरंजीव' असें लिहावें तर ज्ञानदेव ज्ञानानें श्रेष्ठ होते. 'तीर्थस्वरूप' लिहावें तर ज्ञानदेव वयानें लहान होते. मायना काय लिहायचा तेंच ठरेना. म्हणून चांगदवानें कोराच कागद पाठविला!

तो पत्ररूपी कोरा कागद निवृत्तिनाथांच्या हातांत पडला. त्यांनीं तो कोरा कागद वाचला आणि ज्ञानदेवांच्या हातांत दिला. ज्ञानदेवांनीं तो वाचला व मुक्ताबाईस दिला. मुक्ताबाईनें तो वाचला आणि ती म्हणाली, "चांग्या, एवढा मोटा झालास तरी अजून कोराच!"

निवृत्तिनाथांनीं त्या कोऱ्या कागदांत निराळाच अर्थ वाचला होता. ते म्हणाले, "चांगदेव कोरा आहे, शुद्ध आहे, निर्मळ आहे. उपदेश देण्यास योग्य आहे." असें म्हणून त्यांनीं ज्ञानदेवास त्या पत्राचें उत्तर देण्यास सांगितलें.

ज्ञानदेवांनीं पासष्ट ओव्यांचें पत्र चांगदेवाला पाठविलें. ह्यालाच 'चांगदेव-पासष्टी' म्हणतात!

लिहिलेलें वाचणें सोपें असतें. पण न लिहिलेलें वाचणें कठिण. त्यांतील वाचणें संपतच नाहीं.

**नाम्या नामदेव झाला**

संत नामदेव जातीनें शिंपी होता. परंतु सुरवाती सुरवातीला तो लोकांना लुटीत असे, वाटमारी करीत असे असें म्हणतात.

एके दिवशीं तो कुठें धर्मशाळेंत बसला होता. तिथें एक माणूस रडत रडत आपलें दुःख दुसऱ्याला सांगत होता. आपले कष्ट सांगत असतांना तो म्हणाला, "तो नाम्या डाकू आहे ना, त्यानें माझे फार हाल केले आणि माझ्या बायकोलाहि सतावले."

नामदेव तिथें बसलेला होताच. त्याला दुसऱ्याच्या तोंडून आपली 'कीर्ति' ऐकायला मिळाली! त्या माणसाच्या अंतःकरणांतील वेदना नाम्याच्या हृदयाला स्पर्श करून गेल्या. लोखंडाला परिसाचा स्पर्श झाला! नामदेवाच्या जीवनाला एकदम कलाटणी मिळाली. या माणसाच्या जीवनांत दुःख कालवण्याचें काम मी केलें, हें नामदेवाला कळल्यावर नाम्या बेचैन झाला! दुर्जनता एका क्षणांत गेली. घनदाट अंधारांत वीज चमकली!

नामदेवानें तिथल्या त्या धर्मशाळेंतच शुभ संकल्प केला आणि आपलें जीवन बदलून टाकलें. हाच नाम्या पुढें 'नामदेव' झाला.

## नामदेवाचा गुरु

गोरा कुंभार जातीनें कुंभार होता. तो कुंभाराचें काम करीत असे. तो मोठा ईश्वरभक्त होता. एकदां ज्ञानदेव, नामदेव आदि संतांची परीक्षा करण्याचें काम त्याच्याकडे आलें! मडकें कच्चें आहे कीं पक्कें याची परीक्षा करणाऱ्या गोऱ्यानें ह्या सर्वांची परीक्षा आरंभिली. त्यांत नामदेवाचें मडकें कच्चें ठरलें! तेव्हां नामदेवाला आला राग. गोरा त्याला म्हणाला, "नामदेवा! तूं गुरूकडे जा."

त्याला त्यानें गुरूचें नांव, गांव सांगून पाठवून दिलें.

नामदेव गुरूकडे गेला. पण गुरु होता मोठा विलक्षण! नामदेव भेटायला गेला तेव्हां तो मंदिरांत शंकराच्या पिंडीवर पाय ठेवून निजला होता! नामदेवाला हें पाहवले नाहीं. ज्याला गुरू करायला तो आला होता, त्याच्यावर रागावतांहि येत नव्हते! तेव्हां नामदेवानें दुसरा मार्ग काढला. नामदेवानें हळूंच गुरूचे पाय उचलून दुसरीकडे ठेवले. त्याबरोबर खालची पिंडी सरकली व पुन्हां त्याच्या पायाखालीं जाऊन बसली! पुन्हां नामदेवानें पाय हाळवले, पण तोच प्रकार झाला! आतां नामदेवानें करावें तरी काय!

नामदेवाला एकदम बोध झाला. हा दगड जर देव आहे तर तो दगड पण देव नसेल का? तेव्हां एकावर पाय ठेवायचे आणि दुसऱ्यावर डोकें हा कुठला आला भेद! नामदेवाला दृष्टि मिळाली. आतां ह्या नव्या दृष्टीनें तो सगळीकडे पाहूं लागला.

हाच नामदेव पुढें एकदां शिदोरी घेऊन कुठें चालला होता. वाटेंत शिदोरी सोडून तो जेवायला बसला. इतक्यांत नजर चुकवून एक कुत्रा त्यांतली भाकर घेऊन पळूं लागला! नामदेवानें हें पाहिलें. कुत्र्यानें केवळ भाकरी घेतली, पण तूप तर नेलें नाहीं! कोरडी भाकरच त्या कुत्र्याला खावी लागणार हें कसें? त्या कुत्र्याच्या भाकरीवर तूप वाढण्यासाठीं नामदेव त्या कुत्र्यामागें तुपाची वाटी घेऊन पळूं लागला!

हरिरंगानें रंगलेल्या नामदेवाचें जग दुसऱ्या प्रकारचें होतें! तो रंग एकदां लागला म्हणजेच त्याची गोडी लागायची!

## झाला महार पंढरीनाथ

मराठवाड्यांत एक थोर साधुपुरुष होऊन गेले. त्यांचें नांव होतें दामाजीपंत. ते एका मुसलमान राजाच्या दरबारीं कारभारी होते.

एकदां त्या मुसलमान राजाच्या राज्यांत दुष्काळ पडला. गरीब लोक अन्नावांचून मरूं लागले. दादाजीपंतांना हें पाहवेना. ते कारभारी असल्यानें धान्याच्या कोठारांच्या किल्या त्यांच्याकडे असायच्या. पण ते त्या कोठारांचे मालक थोडेच होते! राजाला विचारल्याशिवाय त्यांना कांहीं करणें शक्यच नव्हते.

बरें, विचारून करावें तर तशी स्थिति नव्हती. काळहि बराच लागला असता. लोक पटापट मरत होते. सर्वत्र अन्नान्न दशा झालेली होती. शेवटी दामाजीपंतांना राहवले नाहीं. त्यांनीं स्वतःच्या अधिकारांत—परंतु राजाला न विचारतां—आपल्या ताब्यांत असलेलीं कोठारें लुटवलीं. सर्वांना धान्य मिळालें! सर्वांचे आत्मे तृप्त झाले. गोरगरिबांनीं दामाजीपंतांना मूक आशिर्वाद दिले.

बादशहाला हें कळलें. तो रागावला. दामाजीपंत त्याला म्हणाले, "मी दिवाण आहे. माझी जबाबदारी मला समजते. लोक डोळ्यांसमोर पटापट मरूं लागल्यावर अन्नाचीं कोठारें बंद करून कां ठेवायचीं असतात?"

दामाजीपंतांच्या उत्तरानें बादशहाचें समाधान झालें नाहीं. दामाजीपंत दरबारांतून परतले. त्या सर्व कोठारांतील धान्याची रक्कम राजदरबारीं भरण्याची जबाबदारी दामाजीपंतावर आली होती!

परंतु दामाजीपंताजवळ इतके पैसे होते कुठें? आतां करायचें काय? ही रक्कम ठरलेल्या मुदतींत न भरल्यास घरदार सारें विकायला निघायचें! परंतु दामाजीपंत निश्चित होते. ते आपला भार देवावर घालून होते.

गरिबांच्या कळवळ्यानें दुष्काळांत दामाजीपंत विरघळले आणि दामाजीपंतांची करुणा पाहून इकडे विठ्ठल विरघळला. तो कमरेवरचे हात खालीं घेत विटेवरून उतरला. त्यानें रखुमाईकडून लंगोटी मागून घेतली. महाराचें सोंग केलें. लंगोटी लावली. हातीं काठी घेतली, खांद्यावर घोंगडें टाकलें आणि राजदरबारीं जाऊन ठरलेल्या मुदतीच्या आंत दामाजीपंतांच्या पैशांनी हुंडी पटवून दिली!

दामाजीपंतांना झालेलें कांहींच माहीत नव्हतें. आपण योग्य तेंच केलें अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगत होती. म्हणूनच ते शांत राहूं शकले.

विठ्ठलानें आपल्यासाठीं महाराचें रूप घेऊन दरबारीं पैसे भरल्याचें पुढें दामाजीपंतांना कळलें. ईश्वराची अगाध लीला कशी काम करीत आहे हें लक्षांत आल्यामुळें त्यांचें अंतःकरण भरून आलें.

भक्तांचें रक्षण करण्यासाठीं देव तत्पर असतोच. परंतु तो थोडी कसोटीहि घेत असतो.

# पाश्चात्य व पौर्वात्य संतांची शिकवण

—गुरुदेव रानडे

आदर्श साधूचीं मुख्य लक्षणें कोणतीं याबाबतींत पाश्चात्य व पौर्वात्य संतांच्या शिकवणींत पूर्ण साम्य आहे. पाश्चात्य संतवाङ्मयांत आदर्श संतांचें वर्णन प्लॅटिनसच्या ग्रंथांत सांपडतें. अशा साधूंत अंतर्बाह्य भेद रहात नाहीं व इतर भूतमात्रां विषयींसुद्धां भेदभाव रहात नाहीं. अनुभवाचें शिखर गांठल्यावर अशा साधूच्या अंतःकरणांत कोणतीच वृत्ति उमटत नाहीं. स्त्रियांस पाहून त्याच्या मनांत कामवासना प्रदीप्त होत नाहीं. चिकित्सा व विचारहि विराम पावतात. इतकेंच नव्हे तर जीवात्म्यास स्वतःच्या देहाचीसुद्धां जाणीव राहात नाहीं. सौंदर्याचें ज्ञान नष्ट होतें, कारण तो सौंदर्यातीत राहतो. सर्व सद्गुणांच्या संगीताच्याहि पलीकडेहि तो जातो." सारांश, प्लॅटिनसचा आदर्श साधु बुद्धि, सौंदर्य व सद्गुणातीत असतो. तो जणूं ईश्वरानें पछाडलेला असतो. शून्यांत त्याची बैठक स्थिर झालेली असते व त्यास चिरंतन शांति प्राप्त होते. कोणत्याहि प्रकारचें अतिक्रमण केल्याबद्दल त्याच्या मनांत यत्किंचित्‌हि भीति किंवा कंप राहात नाहीं. त्यामुळें मन अंतर्मुख होऊन कोणत्याहि गोष्टीबद्दल त्यास पश्चात्ताप वाटत नाहीं. त्याची बुद्धि पूर्ण स्थिर झाल्यामुळें तो मूर्तिमंत स्थैर्यच बनतो. उपनिषदांतहि आदर्श साधूचें वर्णन अगदीं याच शब्दांत केलेलें आढळतें. "आत्मज्ञास हीं सर्व भूतें आत्मरूपच वाटतात व तो सर्व भूतमात्रांत एकच आत्मतत्त्व पाहतो; म्हणून त्यास कसलाहि मोह व शोक होण्याचा संभव नाहीं. सर्वांत श्रेष्ठ अशी आत्मानुभवाची इच्छा तृप्त झाल्यामुळें इहलोकींच त्याच्या सर्व वासना नष्ट होतात. कमळाच्या पानास पाण्याचा लेप लागत नाहीं, त्याप्रमाणें त्यास पापकर्मांचा कलंक कधींहि लागत नाहीं. परमेश्वराचा त्यानें आपल्या अंतःकरणांत संग्रह केल्यामुळें त्यास शाश्वत शांति लाभते. योगाभ्यास पद्धतीनें त्यानें ब्रह्माचें ध्यान केलें असल्यामुळें त्याची सर्व इंद्रियें, मन व बुद्धि हीं स्थिर व निश्चल होतात" वर संत प्लॅटिनसनें आदर्श संताबद्दल प्रगट केलेले विचार विचार बहुतेक सर्व महाराष्ट्रीय संतांनीं व्यक्त केले आहेत. हें सिद्ध करण्यास फारशीं उदाहरणें देण्याची जरूरी नाहीं. श्रीज्ञानेश्वर व रामदास यांच्या ग्रंथांतील एकदोन उतारे पुरे आहेत. श्रीज्ञानेश्वर अशा साधुपुरुषाविषयीं म्हणतात, "त्यानें भक्तियुक्त

अंतःकरणानें परमेश्वराचें स्मरण केल्यामुळें इंद्रियांचा व त्यांच्या विषयांचा त्यास विसर पडतो. इंद्रियांची कसमस मोडते व मनाची घडी इंद्रियांमध्यें पडते. आतां शरीरच शरीरास, व श्वासास सांभाळतो. आनंद वाढूं लागतो व ध्यानास बसतां क्षणींच त्याचें इष्ट फल त्यास प्राप्त होतें. मन आपल्यांतच लीन होतें, अंतर्मुख होऊन आपलें आत्म्याशीं असलेलें ऐक्य पाहतें. हा अनुभव प्राप्त झाला कीं, साधक तत्क्षणीं आत्मसुखाच्या साम्राज्यावर आरूढ होतो व आत्म्याशीं एकरूप होऊन त्यांत विरून जातो. श्रीरामदास म्हणतात, "आदर्श साधुपुरुषांस कशाचीहि आशा राहत नाहीं व त्यास राग येत नाहीं. त्याच्या सर्व आशा आत्म्यामध्यें केंद्रीभूत होतात. त्यास घटापटादि नुसत्या शाब्दिक न्यायाची जरुरी नसते. त्यास दुसऱ्याविषयीं द्वेष किंवा मत्सर वाटत नाहीं. त्यास आत्मदर्शन घडल्यामुळें त्यास शोक, मोह व भीतीचें कारण राहत नाहीं. परमात्मा या सर्वांपलीकडे आहे व आत्मा त्या परमात्म्याशीं एकरूप होऊन जातो."

दुरात्मा

दुरात्म्यासंबंधीं प्लॉटिनस व श्रीज्ञानेश्वर यांची शिकवण तंतोतंत जुळते. संत प्लॉटिनस म्हणतात, "दुरात्मा अतिभोगी असतो. तो अन्यायी व अत्यंत विषयासक्त असतो. त्याच्या मनांत विचारांचा गोंधळ माजलेला असतो. तो भित्रा व म्हणून भेकड असतो. हीन विचारांमुळें त्यास दुसऱ्याचा हेवा वाटतो. तो नश्वर व अधम गोष्टींचाच विचार करीत असतो. तो सर्वस्वी दुष्ट असतो. तो केवळ शारीरिक भोगासाठीं जगतो व दुष्टपणामध्यें त्यास आनंद वाटतो." श्रीज्ञानेश्वरांचें आसुरी संपत्तीच्या मनुष्याचें वर्णन म्हणजे वरील प्लॉटिनसच्या वर्णनावर एक संपूर्ण भाष्यच आहे. "असा पुरुष आपल्या ज्ञानाविषयींच बडबड करीत असतो. तो आपल्या सत्कर्मांचीच टिमकी वाजवीत असतो. अरण्यांत वणवा पेटला म्हणजे तो सजीव प्राणी व निर्जीव झाडेंझुडपें यांस सारखेंच जाळतो, त्याप्रमाणें दुष्ट मनुष्य आपल्या कर्मानें सर्व जगाच्या दुःखास कारणीभूत होतो. त्याचें मन संशयांनीं ग्रस्त झालेलें असतें. रानांतील विहिरीप्रमाणें त्याचें मन घाणेरडें असतें. या विहिरींत वर कांटे व आंत हाडें भरलेलीं असतात. चंचलतेच्या बाबतींत तो माकडाचा भाऊ शोभतो. मोकाट सोडलेल्या बैलाप्रमाणें त्याचें मन चोहोंकडे भटकत असतें. तो सदैव विषय–सेवनांत मग्न असतो. त्यास लीनता म्हणजे काय हें माहीतच नसतें व तो लाटण्याप्रमाणें यत्किंचितहि लवत नाहीं. जाऊं नये तेथें तो जातो; ज्यास मानानें व देहानें स्पर्श करूं नये त्यास तो कवटाळतो. पाहूं नये तें पाहतो. त्याची सर्व लज्जा नष्ट झालेली असते. दुसऱ्याची निंदा ऐकण्याच्या बाबतींत त्याचे कान सदैव उघडे असतात. निष्ठुरतमुळें त्याचें मन म्हणजे सापाच्या बिळाप्रमाणें असतें. त्याची दृष्टि म्हणजे बाणवृष्टीप्रमाणें असते. त्याचें भाषण म्हणजे अग्निवर्षावाप्रमाणें

दाइक असतें. तो गुणदोषांची खिचडी करतो व त्यांच्या भिन्न परिणामांचें त्यास ज्ञान नसतें. ईश्वरी इच्छेविरुद्ध तो वागतो व आपत्तीच्या उकिरड्यावर लोळत राहतो. तो म्हणजे संसार–नगरीचा पाणवठाच होय." (म. मि. पा. ८२–९२).

### देऊळ आणि देव

पौर्वात्य संत निवृत्तिनाथ व पाश्चात्य संत प्लॉटिनस यांनी जें आत्मानंदाचें बहारीचें वर्णन केलें आहे तें देखील अगदीं सारखें आहे. निवृत्तिनाथांनीं लिहिलेल्या एका सुप्रसिद्ध आरतींत ते म्हणतात, "राउळांत जातांच माझी देहावस्था गळली. मन हें उन्मन झालें. बद्धतेची वार्ता राहिली नाहीं. सर्व हेतु मावळले. शब्दाला निःशब्दता आली. मी आत्मरूप पाहून तटस्थ राहिलों. आत्मतेज पाहत असतां डोळ्यांचीं पातीं हलेनाशीं झालीं. दिवस व रात्र यांतील भेद कळेना झाला. आत्मतेज उजळलें. तें ब्रह्मांडांत मावेनासें झालें. अनाहत नादानें सर्व विश्व दुमदुमलें. मी आनंदसागरांत बुडालों. तो आनंद शब्दांनीं सांगतां येत नाहीं." आतां याची तुलना संत प्लॉटिनसनीं देवळाचें जें वर्णन दिलें आहे त्याच्याशीं करूं. संत प्लॉटिनस् देवळाचा अर्थ 'आत्मानंद' असा करितात व 'देवाच्या मूर्ती' याचा अर्थ जागृतींत इंद्रियद्वारा अनुभवलेल्या गोष्टी. या मूर्ती देवळाच्या बाह्यांगणांत सोडून देवळाच्या गाभाऱ्यांत जो प्रवेश करतो तोच खरा संत होय. "मूर्ति म्हणजे कमी प्रतीचें दृश्य आहे. देवळाचा गाभारा म्हणजे दृश्य नव्हे! ती एक विशेष प्रकारची जागृति आहे. तो एक प्रकारचा निरतिशय आनंद आहे. तो आत्म्याचा विकास आहे. ती ब्रह्मस्पर्शाची तीव्र तळमळ आहे. ती पूर्ण ऐक्य पावण्यासाठीं केलेली विचाराची साम्यावस्था आहे. देवळांतील गाभारा या दर्शनासाठीं राखून ठेवलेला असतो." मनाच्या सूक्ष्मतम अवस्थेस येथें आत्मानंद किंवा देवळांतील गाभारा असें म्हटलें आहे. स्थूल अवस्थांना बाह्य प्रांगण म्हटलें आहे. देवळाच्या बाह्य अंगणांत जमणारे लोक बरेच असतात; परंतु देवळाच्या गाभाऱ्यांत शिरणारे फार थोडे असतात.

### आत्मानुभवांची तुलना.

सर्व देशांतील व कालांतील संतांना आलेला इंद्रियातीत आत्मानुभव हा सर्वांना सामान्य व एकप्रकारचा असल्याबद्दल येथें जास्त चर्चा करण्याची जरुरी नाहीं. या पौर्वात्य व पाश्चात्य संतांचे विशेष एकदोन अनुभवहि कसे एकच आहेत याचें येथें थोडें दिग्दर्शन करूं. प्रथम, वासाच्या आध्यात्मिक अनुभवासंबंधीं श्रीनिवृत्तिनाथ सांगतात कीं, "देवाचा अनुभव चंदनाच्या परिमळापेक्षां जास्त गोड आहे. परमेश्वर खरोखर जाई, जुई, मोगरा इत्यादि अनेकविध फुलांपेक्षां जास्त सुगंधी आहे. कल्पवृक्ष इच्छिलेलें सर्व देतो, परंतु परमात्मा या वृक्षापेक्षां जास्त सुगंधी आहे.


ईश्वराचें तेज मला मूर्तिमंत सुगंधच आहे. अशा प्रकारच्या जीवनांत मला आनंद आहे." देवाच्या परिमलासंबंधीं श्रीनिवृत्तिनाथांनीं असें विधान केलें आहे. याची सेंट जॉन ऑफ दि क्रॉस याच्या पुढील विधानाशीं तुलना करतां येईल. "जीवात्म्याच्या खोल अंतःकरणांत शब्दब्रह्माची खळबळ होते व आत्मा जागृत होतो. ही आत्मजागृति दिव्य, देदीप्यमान व परिणामकारक असते. ती इतकी नितांत सुगंधी असते कीं, जगांतील सर्व विलेपनें, धूप व सुगंधी फुलें मिसळून व घुसळून जणुं हा एक नवीन सुगंध तयार केला आहे!" तसेंच देवाच्या काळेपणाच्या बाबतींत श्रीज्ञानेश्वर व संत अँजेला फोलिनो यांच्या लिखाणांत असाधारण साम्य आहे. श्रीज्ञानदेव म्हणतात: "काळ्या रंगाचा देव दृष्टीसमोर दिसला, म्हणजे त्याची यथार्थ व पूर्ण स्तुति कधींच करतां येत नाहीं. हाच काळा देव स्वर्गांत राहतो. तोच आत्मा आहे. या डोळ्यांनीं मी त्यास पाहिलें आहे. हा काळ्या सर्शी काळा खेळ खेळतो. तो काळ्या, निळ्या स्वरूपात प्रगट होतो. या गडद निळ्या रंगानें सर्व विश्व भरलें आहे. सर्व आकाश त्या निळ्या प्रकाशांत विरून जातें. हा निळा देव आपल्या सर्वांच्या अंतःकरणांत राहतो." संत अँजेला फोलिनो आपल्या "दैवी समाधान" या पुस्तकांत लिहितात. "मग मला देवाचें काळें रूप दिसलें. हा काळेपणा म्हणजे कल्पनातीत कल्याणप्रद व शुभंकर आशीर्वाद आह. त्याची बरोबरी करील अशा कोणत्याच वस्तूची आपल्यास कल्पना करवत नाहीं. या आशीर्वादरूप काळ्या दर्शनामुळें देवाची मला प्राप्ति झाली याविषयीं माझी खात्री झाली. आतां त्याविषयीं माझ्या मनांत यत्किंचितूहि संशय कधींहि येणें शक्य नाहीं. या नितांत व अनिर्वचनीय काळ्या रंगांत परमेश्वरास पहाण्याचें श्रेष्ठ व दिव्य सामर्थ्य माझ्या जीवास त्यानें दिलें व मला उत्पन्न केलें. तें रूप मी फक्त तीनदांच पाहिलें. तें पुनः मला दिसलें नाहीं. मी अनंत वेळां देवास पाहिलें. व प्रत्येक वेळीं काळ्या रूपांत पाहिलें. तरी इतक्या उज्ज्वल व नितांत काळ्या रंगांत त्यास कधींच पाहिलें नाहीं" या संतांनीं या काळेपणाचें वर्णन केवळ अलंकारिक भाषेंत केलें नाहीं. ज्ञानचक्षुंपुढें त्यांना जें प्रत्यक्ष नितांत सत्य—रूप दिसलें, त्याचें हें वर्णन आहे.

### नाम महिमा

पाश्चात्य संतश्रेष्ठांप्रमाणेंच त्यांच्या हिंदी संतबंधूंनीं परमार्थांत नामाचें महत्त्व व सफलता यांचें तितक्याच जोरानें व आग्रहानें वर्णन केलें आहे. हिंदु व ख्रिश्चन या दोन धर्मांना एकत्र निगडित करणारें एक श्रेष्ठ तत्त्व म्हणजे नामस्मरण होय. "ईश्वराची प्राप्ति करावयाची झाल्यास ईश्वराच्या नामाच्या साहाय्यानें ईश्वराचें ध्यान करावें. हें एकच साधन अचूक फलदायी आहे." हें तत्त्व या दोनही पंथांतील आत्मज्ञांनीं सारख्या अट्टाहासानें सांगितलें आहे. नामाचें इतकें अवाढव्य व विशेष सामर्थ्य

केवळ ख्रिश्चन धर्मांतच मानलें आहे असें नाहीं. इजिप्शियन व यहुदी धर्मांत सुद्धां नामस्मरणावर तितकाच जोर दिला आहे. डॉ. फार्नेल 'धर्मांची उत्क्रांति' या ग्रंथांत म्हणतात : "इजिप्शियन लोकांचा अगदीं पहिला देव म्हणजे 'रा' होय. त्यानें आपल्या स्वतःसदेखील आपल्या अद्भुत नामाच्या उच्चारानें निर्माण केलें, मग विश्वांतील सर्व वस्तू उत्पन्न केल्या." "यहवेह" या देवी नामाबद्दल हेब्रू लोकांची हीच मनोवृत्ति आहे. ख्रिश्चन धर्म देवाचें नाम सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहे असें मानतो. "तुझ्या पवित्र नामाचा जयजयकार असो." "तें नाम सर्व नामापेक्षां श्रेष्ठ आहे." देवाचेंच नव्हे, तर 'जीजस'चें नामसुद्धां तितकेंच पवित्र आहे, असा ख्रिश्चन धर्माचा आग्रह आहे. म्हणून त्याचें नामस्मरण ईश्वराच्या नामस्मरणाइतकेंच फलदायी आहे, असें त्याचें मत आहे. रोले नामक ग्रंथकार आपल्या 'जीजसच्या पवित्र नामाचे सद्गुण' या ग्रंथांत म्हणतो कीं, "हे जीजस, तूं खरोखरच मानवाचा त्राता आहेस. म्हणून तुझें जीजस तें नांव यथार्थ आहे. अहाहा ! तें तुझें आश्चर्यानें थक्क करून सोडणारें नाम ! तें आनंददायक नाम ! हें नाम सर्व नामांपेक्षां श्रेष्ठ आहे. त्यावांचून कोणासहि मुक्ति मिळणें शक्य नाहीं. खरोखर, जीजसचें नांव म्हणजे माझ्या मनांतील आनंदी गीत आहे. माझ्या कानांत घुमणारें दैवी संगीत आहे. तें माझ्या जिभेवरील अत्यंत गोड मधु–माधुर्य आहे. माझ्या सर्व संकटांत व मनस्तापांत या नामापासूनच मला समाधान मिळतें. म्हणून या नामावर माझें निरतिशय प्रेम आहे यांत काय आश्चर्य !" 'अजाण–मेघ' या परमार्थ ग्रंथांत म्हटलें आहे कीं, "आपल्यास आवडणाऱ्या कोणत्याहि देवाच्या नामाचें स्मरण करावें. जेवढें तें लहान असेल तेवढें जास्त बरें. परमेश्वराशीं ऐक्य एका नामांत 'दुमडून कोंबलेलें' तुला हवें असेल व अशा नामाचें तुला स्मरण करावयाचें असेल, तर देवाचें 'एक' अक्षरी नाम घे. दोन अक्षरी नामापेक्षां हें श्रेष्ठ आहे. कारण जेवढें नाम लहान, तेवढें तें देवाच्या रूपाशीं मिळतें असतें. अशीं नांवें म्हणजे 'देव' व 'प्रेम' हीं होत. यांपैकीं आवडेल तें नाम घे. किंवा दुसरें एखादें नाम घे. तुला सर्वांत जास्त पसंत असेल तें एकाक्षरी नाम घे. तें हृदयांत घट्ट धरून ठेव. कोणतीहि आपत्ति आली तरी तेथून त्याला हलूं देऊं नको. युद्धसमयीं किंवा शांतताकाळीं हें नामच तुझा भाला व हें नामच तुझी ढाल बनेल. या नामाच्या साहाय्यानें तुझ्यावर असलेला अज्ञानाचा ढग व तुला व्यापणारा काळोख यांना तूं मागें सारूं शकशील. या नामानें विस्मृति–ढगामागें असलेल्या सर्व वाईट विचारांचा तूं नाश करशील." महाराष्ट्रसंतांनीं या नामाचें महत्त्व व फल किती उत्तम प्रकारें सांगितलें आहे, हें येथें विस्तारानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. या प्रकरणीं त्यांची शिकवण पाश्चात्य संतांच्या शिकवणुकीबरहुकुम आहे, हें दाखविण्यासाठीं श्रीज्ञानेश्वर, श्रीरामदास व श्रीतुकाराम यांच्या ग्रंथांतील थोडे उतारे येथें देणें अप्रस्तुत होणार

हीं. श्रीतुकाराम सांगतात, " नामाची गोडी अवर्णनीय आहे. दुसऱ्या गोडीनें जीभ टते. परंतु नामाची गोडी हरघडी वाढतच जाते. वस्तुतः नामाची गोडी प्रत्यक्ष वराघहि कळावयाची नाहीं. कमळाच्या वेलीला कमलांचा सुगंध कळत नाहीं. शिंपांना आंतील मोत्यांचा आनंद उपभोगतां येत नाहीं." श्रीरामदास म्हणतात: "सुखांत व दुःखांत असतांना नाम विसरूं नये. जेव्हां आपल्यावर आपत्ती कोसळतात व आपण आयुष्यांत उद्वेगानें व चिंतेनें ग्रस्त होतों, तेव्हां नामस्मरण करावें. नामस्मरणानें सर्व विघ्नांचें निवारण होतें. आलेल्या सर्व आपत्ती नाहीशा होतात. नामस्मरणामुळें प्रल्हाद अनेक अपघातांपासून सुटला. देवाचीं सहस्र नामें आहेत. त्यापैकीं कोणत्याहि नामाचा जप केला तरी चालेल.



## श्रीज्ञानेशांची शिकवण

मनावर ताबा न मिळवितां वरवर देहास दंडन करून काय उपयोग! आम्ही गृहस्थाश्रम किंवा त्यांतील क्रियाकर्म व कुळधर्म सांडण्याची मुळींच जरुरी नाहीं. देव मिळविण्याचें वर्म वेगळेंच आहे. श्रीगुरुनाथांनीं जोपर्यंत मस्तकावर हात ठेवून कृपा केली नाहीं, तोंपर्यंत मनास शांति भासणार नाहीं. गुरु हा खरोखर संत-कुळीचा राजा आहे. तो सुखाचा सागर व प्रेमाचा आगर आहे. तो धैर्याचें डोंगर आहे; तो वैराग्याचें मूळ आहे. गुरु हा साधकांस नेहमीं साहाय्य करतो हा कामधेनु आहे; तो भक्तांघरीं दुभतो व त्याच्या सर्व इच्छा पूर्ण करतो. तो भक्तांचें मंडन; दुष्टांचें दण्डण सर्व पापांचें खंडन करतो. भगवंताच्या नामस्मरणानें जाणीव-नेणिवेचा नाश होतो व मुक्ति मिळते. प्रल्हादानें नामस्मरण केलें व देव त्याच्या संरक्षणास धांवून आला. देवाचें नांव उत्तमांत उत्तम आहे व पवित्र नि समर्थ आहे. ध्रुव, गजेंद्र, अजामीळ आणि वाल्मीकि यांचा उद्धार नामानेंच झाला. नामोच्चारण करतांक्षणीं पापांच्या राशी जळून जातात.

# गुरु नानकांची गोष्ट

***************************

शिखांचे धर्मगुरु नानकसाहेब यांच्या लहानपणाची गोष्ट आहे.

नानकसाहेबांचे वडील व्यापारी होते. एक दिवस वडिलांना दुसरें कांहीं काम होतें म्हणून त्यांनीं बाल नानकाला दुकानांत बसायला सांगितलें.

नानक दुकानांत बसला. त्यानंतर कुणी एक जण कांहीं वस्तु घ्यायला आला बहुधा धान्य घ्यायला तो आला असावा. धान्य मापानें मोजून द्यायचें असतें त्याप्रमाणें नानक एक एक माप मोजून त्याच्या पसरलेल्या कपड्यावर टाकीत होते व एऽऽक, दोऽऽन, तीऽऽन, चाऽऽर असें म्हणत जात होते. मोजत मोजत ते अकरा, बारापर्यंत आले. आणि जेव्हां तेरावें माप त्याच्या कपड्यावर त्यांनीं उलटें केलें तेव्हां म्हणाले—तेऽऽरा.

आणि हा 'तेरा' शब्द ऐकल्याबरोबर त्यांना वाटूं लागलें, खरोखरच हे सारें 'तेरा ही तेरा'च आहे. हिंदींत तेराचा अर्थ होतो तुझें. सगळें 'तुझेंच तुझें' आहे आणि ह्याची जाणीव झाल्यावर तो बाल नानक आपल्या तल्लीनतेंत मुखानें तेऽऽरा, तेऽऽरा करीत धान्यानें माप भरत गेला आणि समोरच्या कपड्यावर उलटें करीत गेला! मात्र तेरावरून चौदावर त्याची गाडी गेलीच नाहीं!

वडिलांनीं विचार केला कीं अशा मुलाला दुकानावर बसवलें तर दिवाळेंच निघायचें! त्यांनीं त्याला दुकानावरून हटवले आणि त्या बाल नानकाला त्यामुळें आनंदच झाला!

## धर्म कसा वाढेल?

कर्नाटकांत वीरशैव लिंगायतांचे गुरु बसवेश्वर होऊन गेले. त्यांना बसवण्णा म्हणत. 'स्त्री–पुरुषांचा समान अधिकार असावा; जातिभेद, उंचनीचता नसावी; सर्वांनीं शरीरश्रम करावा' असा ते उपदेश देत. फक्त बसवेश्वरांनींच नाहीं, कितीतरी जणांनीं धर्माची इमारत उभी करण्याचा आपल्या परीनें यत्न केला. परंतु अजून धर्म-स्थापना झालेली दिसत नाहीं. आजहि धर्माची इमारत उभी करण्याचा यत्न चालूच आहे.

पूर्वी यंत्र नव्हतें, त्यावेळीं लोक घरोघरीं सूत काढून खादी वापरीत असत. पुढें यंत्र आलें तेव्हां लोकांची खादी सुटली. यंत्रापूर्वी लोक नाइलाजानें खादी वापरीत असत. आज भर यंत्रयुगांतहि लोक खादी वापरीत आहेत. यंत्रावर तयार

केलेला सुबक कपडा आज बाजारांत विपुल मिळतो. शिवाय स्वस्तहि. तरीसुद्धां वापरणारे खादी वापरीत आहेत. कां? तर ती विचारांनीं स्विकारली आहे म्हणून.

हीच गोष्ट धर्माबाबत. पूर्वी आजच्या इतकें विज्ञान नव्हतें. त्यावेळीं धर्मांची उभारणी श्रद्धेवर होती. त्या श्रद्धेवर विज्ञानानें आघात करायला सुरवात करायला धर्मांची इमारत हादरूं लागली. भक्त पुरंदरदासांनीं एका भजनांत म्हटलें आहे. 'पहा, तुम्ही आईबापांची आज्ञा न पाळाल, तर तुमची चामडी सोलली जाईल.' आतां ही चामडी केव्हां सोलली जाणार? मेल्यावरच ना? स्वर्गनरकाची कल्पनाच ज्यांना मान्य नाहीं त्यांना मग आधार कशाचा? आधार लागेल विचाराचा. धर्मांची स्थापना आतां वैज्ञानिक विचारावर करायची गरज आहे. आणि विज्ञान आपल्या गतीनें तुम्हांला तसें करायला बाध्य पण करीत आहे.

आज एका प्रोफेसराला दरमहा पांचशे रुपये पगार मिळतो! वर्षांतून सहा महिने सुट्टी आणि फक्त सहा महिने काम. शिवाय रोज तीन तासाहून अधिक वेळ काम नाहीं. म्हणजे पांचशें रुपयाप्रमाणें त्याला बारा महिन्याला सहा हजार रुपये पगार आणि काम सहाशें तासांचें! म्हणजे तासाला दहा रुपये त्याला मिळणार आणि शारिरिक श्रम करून जगणाऱ्या बसवण्णाच्या शिष्याला तासाला मिळणार तीन आणे! आतां विज्ञान युगांत हें चालणारच नाहीं. थोडक्यांत, धर्मविचार सर्वांच्यासाठीं हवा. परिपूर्ण हवा. एकांगी चालणार नाहीं.

व्यक्तिसाठीं जो धर्म असेल त्याची साऱ्या समाजांत प्रतिष्ठा हवी. साऱ्या समाजासाठीं तदनुसार रचना हवी. धर्म कुणा एकासाठीं नाहीं, तो सर्वांना लागूं आहे. पण तसें आज दिसत नाहीं. लग्न झालेली स्त्री, पतिव्रता आहे याचे सूचन म्हणून गळ्यांत मंगळसूत्र घालते, कुंकू लावते. परंतु स्त्रियांप्रमाणें आपण सुद्धां पत्नीव्रती आहोंत म्हणून पुरुषांनीं कांहीं चिन्ह धारण करायला नको का?

त्यांच्या अंगावर असें एखादें चिन्ह का नसावें? फक्त एकाच पक्षाची ही जबाबदारी कां म्हणून?

जो धर्म सर्वांना लागूं नाहीं तो ह्यापुढें टिकणार नाहीं. थोडक्यांत, व्यक्तीसाठीं धर्म हवा हें ठीकच आहे. परंतु तदनुसार समाज घडवावा लागेल, तेव्हांच कुठें समाजांत धर्मांची स्थापना होईल; त्याला प्रतिष्ठा लाभेल.

खरें म्हणजे आज ज्याला आपण हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पारशी आदि धर्म म्हणून म्हणतो हे सारे धर्म नाहींत. ह्या साऱ्या श्रद्धा आहेत. खरा मानव-धर्म अजून स्थापन व्हायचा आहे. त्यासाठीं नव्या पद्धतीनें विचार करावा लागेल.

# सत्पुरुष स्वामीनारायण आणि त्यांचें कार्य

लेखक : पी. बी. के.

सुमारें दोनशें वर्षांपूर्वीची ही घटना आहे. अयोध्यानगरीजवळच्या एका गांवं १७८१ सालीं देवधर्माबद्दल आदर बाळगणाऱ्या एका ब्राह्मण कुटुंबांत एक मूल जन्माला आलें त्याचें नांव होतें घनश्याम.

बालपणापासून त्या बालकाची देवधर्माकडे प्रवृत्ति होती. देवाचें नांव त्याला अत्यंत आवडे. त्याचे वडील मोठे पंडित होते. धर्मनिष्ठ होते व ईश्वरभक्त होते.

एकदां काशीक्षेत्रांत पंडितांची सभा भरली होती. वेदान्त हा चर्चेचा विषय होता आणि त्या चर्चेचा समारोप करून अखेरचा निर्णय देण्यासाठीं घनश्यामच्या विद्वान वडिलांची योजना करण्यांत आली होती. घनश्याम त्यावेळीं अवघ्या पांच वर्षांचा होता. तो वडिलांबरोबर त्या पंडित सभेला हजर राहिला होता. बाल घन-श्यामची चमक पाहून सारे पंडित थक्क झाले होते. आठव्या वर्षी त्याचें मौजीबंधन करण्यांत आलें. त्यानंतर त्याचें अध्ययन सुरू झालें. त्याची बुद्धिमत्ता, धारणाशक्ति अचाट व आश्चर्यकारक होती. त्यानंतरच्या तीन वर्षांच्या काळांत त्यानें वेद, उपनिषदें, धर्मशास्त्रें, पुराणें, प्रस्थानत्रयी, षड्दर्शनें वगैरे सर्वांचें अध्ययन नि पारायण केलें. इतक्यांत त्यांची मातोश्री भक्तिदेवी व तिच्या मागून त्यांचे वडील इहलोक सोडून गेले.

घनश्याम त्यावेळीं बारा वर्षांचा होता. निकटवर्ती नातलगांचा वियोग घडल्या-नंतर त्याचसुमारास त्यांनीं आपलें घर सोडलें. ( १७९२ ) घर सोडलें एवढेंच नव्हे तर सर्वस्वाचा त्याग करून एक संन्यासी या नात्यानें ते हिमालयांत गेले व तेथील जंगलांत वास्तव्य करून त्यांनीं योगाभ्यास सुरू केला. सुदैवानें त्याबाबतींत यदृच्छेनें त्यांना गोपाळयोगी यांचें अजोड मार्गदर्शन प्राप्त झालें. 'कष्टेंविण फळ नाहीं'—याची जाणीव त्यांना पुरेपूर झालेली होती. नंतर त्यांनीं तपश्चरण सुरू केलें, नाना कष्ट भोगले. परंतु ते स्वच्छेनें.

इतकें करूनहि त्यांचें समाधान झालें नाहीं. त्यांनीं भारताच्या बहुतेक सर्व भागांतून दौरा काढला. सर्व तीर्थक्षेत्रें व तेथील परिस्थिति अवलोकन केली. त्यांना जनस्थिति बारकाईनें पहायची होती. जनतेंतील धर्मभावना, चालीरीती, नीतिमत्ता ह्यांची स्वतःपुरती पहाणी करायची होती.

घनश्याम ज्या ज्या ठिकाणीं जात त्या त्या ठिकाणी त्यांना कोणी ना कोणी विद्वान, शास्त्री–पंडित भेटत असतच. ते जिज्ञासू वृत्तीनें त्यांना जे प्रश्न विचारीत त्यांत पांच प्रश्नांचा प्रामुख्यानें समावेश झालेला असे. ( १ जीव, २ ईश्वर, ३ माया, ४ ब्रह्म व ५ परब्रह्म. )

ते याबाबतीत प्रश्न विचारीत. परंतु त्यांना कोठेंही समाधानकारक उत्तर मिळूं शकलें नाहीं.

शेवटीं ते सौराष्ट्र प्रांतांत आले. त्या भागांतील लोज नामक गांवी रामानंदस्वामी या नांवाचे एक सत्पुरुष रहात असत. त्यांचा त्या भागांत फार मोठा लौकिक होता. त्यांना उद्धवाचा अवतार मानण्यांत येत असे. रामानंद यांस भगवंताच्या पुण्यपावन दर्शनाचा लाभ घडलेला होता. त्यांना स्वप्नांत गुरुमंत्र मिळाला होता व त्यावेळेपासून त्यांची वृत्ति पालटलेली होती. त्यांनीं श्रीरामानुजाचार्य यांच्याकडून श्रीरंगम् येथें वैष्णव धर्माची दीक्षा घेतली होती. त्यानीं कच्छ, गुजराथ नि सौराष्ट्र हें आपलें कार्यक्षेत्र ठरवून त्या भागांत वैष्णव धर्मांचा प्रचार चालविला होता.

घनश्याम ज्यावेळी रामानंद स्वामींची कीर्ति ऐकून त्यांची भेट घेण्यासाठीं गेले तेव्हां ते आश्रमांत नव्हते. जवळपासच्या कुठल्यातरी गांवीं गेले होते. तेथें त्यांना भेटले स्वामीजींचे पट्टशिष्य मुक्तानंदजी.

त्यांची भेट झाल्याबरोबर घनश्यामजींनीं आपले ते पांच प्रश्न त्यांच्यापुढें ठेविले आणि काय आश्चर्य ! त्या पांचही प्रश्नांचें समाधानकारक उत्तर त्यांना तेथें मिळालें !

मुक्तानंदजी हे अध्यात्माच्या दृष्टीनें फार पुढें गेलेले होते. ते समाधानकारक उत्तरें देऊन थांबले नाहींत तर त्यांनीं घनश्यामजींना रामानंदजी येईपर्यंत आश्रमांत रहाण्याचा फार आग्रह केला. योगायोगाच्या गोष्टी आहेत या ! त्यांना तेथें रहाण्याची बुद्धि झाली. त्यांचें मन तेथें रमलें. रामानंदाच्या भेटीची ते उत्कंठेनें वाट पहात होते. त्या दरम्यान आश्रमांतील एकंदर व्यवस्था, टापटीप, वागणूक सर्व कांहीं मनासारखें वाटलें.

एके दिवशीं आपला दौरा संपवून रामानंदजी आश्रमांत आले. त्या दोघांची ती भेट म्हणजे जिवाशिवाची भेट होती म्हणा ना. रामानंदस्वामींनी घनश्यामजींना आपल्याबरोबर आश्रमांत रहाण्याची विनंती केली व ती त्यांनीं मान्य केली. रामानंदजींनी त्यांना वैष्णव धर्माची दीक्षा देऊन त्यांना सहजानंद हें नांव बहाल केलें. परंतु काय असेल तें असो, तें नांव मागे पडून घनश्यामजी स्वामीनारायण या नांवानें नंतरच्या काळांत सुविख्यात झाले,

रामानंद स्वामींचा शिष्यपरिवार फार मोठा व त्या भागांत सर्वत्र पसरलेला होता. त्यांत अनेक विद्वान व थोर पदाला पोहोंचलेले शिष्य होते. जुने होते, अनुभवी होते. सर्व कांहीं होते. परंतु यानंतर सुमारें एक वर्षानें आपल्या मागें आश्रमाची

व्यवस्था कोणी पहावयाची व आपल्या जागीं कोणी यायचें हा विचार, स्वामीजीपुढें आला तेव्हां त्यांनीं सर्व नव्या-जुन्या शिष्यांना वगळून स्वामी नारायण यांस आपल्या मागे पदाधिकारी नेमिलें; त्यांचें वय त्यावेळीं वीस वर्षांचे होतें.

ही व्यवस्था लावून झाल्यानंतर रामानंदस्वामींनीं समाधि घेतली.

'जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूति,' हें अगदीं अक्षरशः खरें आहे. जनतेंत न्यायनीति, धर्मभावना यांचा जेव्हां लोप होऊं लागतो व जनता उद्धाराचा मार्ग सोडून ज्यावेळीं भलत्याच आडमार्गानें जाऊं लागते तेव्हां त्यांना योग्य मार्गावर आणण्यासाठीं एखाद्या प्रभावशाली महापुरुषाची जरुरी भासत असते. कोणाला ना कोणाला निमित्तमात्र करून ईश्वर ती गरज भागवीत असतो. तो परम दयाळू आहे. 'बुडतें हें जन । पहावेना डोळा ।' अशी झालेली असते अवस्था ! संत म्हणजे कोण ! भगवंतच ! कोणत्या तरी रूपानें ते आमच्यांत येतात आणि वावरूं लागतात.

त्या काळीं गुजरात प्रांतांतील जनतेवर स्वामी नारायण यांनीं आपला पगडा हां हां म्हणतां बसविला. जरूर भासली तेथें चमत्कारांची चुणूक दाखवून, स्वतःला लोककल्याणाला वाहून घेऊन त्यांनीं बहुजनसमाज आपल्याकडे खेचून घेतला. लोकसेवा हेंच त्यांचे ब्रीद होतें. दुष्काळांत जनतेची अन्नान्न-दशा होऊं लागली तेव्हां त्यांनीं आपल्या वजनाचा सदुपयोग करून त्यांनीं गोरगरिबांस व अनाथांस अन्न पोहों-चविलें. रोग्यांना व आजाऱ्यांना औषधपाण्याची सोय केली. ज्याला ज्याची गरज, त्याची ती गरज दूर करण्यासाठीं, ते व आश्रमवासी झटले.

जनतेची मनें काबीज केल्यानंतर स्वामी नारायण यांनीं व त्यांच्या शिष्यांनीं जनतेंत धर्माचा व नैतिक मूल्यांचा प्रचार जारीनें सुरू केला. त्याची त्या काळीं त्या भागांत फार जरूरी होती. परंतु एकट्यादुकट्याच्यानें का हें कार्य पार पडायचें ! त्यासाठीं त्यांनीं आपल्या शिष्यांपैकीं थोडे थोडके नाहींत तर पांचशें शिष्य निवडून काढले व त्यांना जरूर ती तालीम नि दीक्षा दिली. त्यांना त्यागी जनसेवक बनविलें. या जगांत माणसानें येऊन जनसेवेशिवाय दुसरें काय करायचें ? जनसेवा हीच प्रभू सेवा, या भावनेनें भारलेले ते पाचशें शिष्य स्वामी नारायण यांनीं निरनिराळ्या भागांत पाठविले.

एवढ्यावरून पहातां स्वामी नारायण यांची योग्यता व जनसेवेसंबंधींची तळमळ कोणत्या प्रकारची होती हें समजून येईल. आपला समाज धार्मिकदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या खालीं खालीं जात चालला आहे. त्याची पातळी उंचावण्यांत आली पाहिजे ही तळमळ त्यांना सतत लागून राहिली होती.

तुम्हीं लोकांची सुधारणा करण्यासाठीं बाहेर पडतां तेव्हां प्रथम तुमची अंतर्बाह्य सुधारणा झाली पाहिजे. त्या कार्याला वाहून घेण्याची योग्यता तुमच्यासाठीं आली पाहिजे. तरच तुम्हीं परिणामकारक कार्य करू शकाल; एरवीं नाहीं.

स्वामी नारायण ह्यांस या गोष्टीची जाणीव पूर्णतया झालेली होती. त्यांनीं विशेषतः पांच गोष्टीवर विशेष भर दिला होता. कार्यकर्ता प्रचारक कसा असावा? निष्काम, निर्लोभ, निर्मम, निःस्वाद व निस्नेह असला पाहिजे, याबाबतींत त्यांचा कटाक्ष होता.

तसेंच प्रत्येक माणसानें आपलें जीवन कशा रीतीनें घालवावें याबद्दलही त्यांची शिकवण ठरलेली होती. मद्यपान, मांसाहार यांचा त्याग करण्यांत आला पाहिजे. एकपत्नीव्रत पालन केलेंच पाहिजे. चोरी, लबाडी यांच्यापासून नेहमीं दूर राहिलें पाहिजे. आणि याशिवाय सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जो व्यवसाय, जो कामधंदा यदृच्छेनें तुमच्या वाट्यास आला असेल, तो तुम्ही मनोभावें व कर्तव्यबुद्धीनें पार पाडण्यासाठीं झटलें पाहिजे. तेंच तुमचें योगसाधन. त्याच्या जोडीला सत्याचरण, अहिंसा वगैरे तत्त्वांचें पालन हें आवश्यक होतें.

त्यांची ही सारी शिकवण जनता उद्धारार्थ होती. असंख्य लोकांवर या शिकवणुकीचा प्रभाव पडून ते स्वामीनारायण पंथांत दाखल झाले.

स्वामीनारायण आणि त्यांचे शिष्य यांनीं हें जें लोकोद्धाराचें कार्य चालविलें होतें तें निर्विघ्नपणें, त्याकाळीं चालू होतें असें कोणीही समजूं नये. तुम्हीं सत्याच्या सरळ मार्गानें जेव्हां जाऊं लागतां तेव्हां त्या काळांत असत्याच्या थोतांडी मार्गानें जाणारे व साधुत्वाच्या वरपांगी बुरखा घेऊन समाजांत स्वार्थासाठीं वावरणारे जे लोक असतात त्यांना सत्याचा प्रकाश सहन होईनासा होतो. कारण त्यामुळें त्यांच्या स्वार्थावर गदा येऊं लागते. मग त्यांची कुरकुर सुरू होते. येनकेन् प्रकारेण त्यांच्याकडून उपद्रव होऊं लागतो. तसा उपद्रव स्वामीनारायण यांस सोसावा लागलेला आहे. प्रतिकार न करतां तो त्रास त्यांनीं निमूटपणें सोसला. कारण शेवटीं जय होणार तो सत्याचाच, याबद्दल त्यांची खात्री होती.

मागासलेल्या वर्गांत, हरिजनांत व स्त्रीवर्गांत स्वामी नारायण पंथाच्या लोकांनी जें कार्य केलें तें चिरस्मरणीय व अत्यावश्यक होतें. प्रचारकार्याची जरूरी सर्वांत जास्त कुठें आहे हें त्यांनीं बरोबर ओळखलें होतें.

स्त्रीवर्गांत प्रचार कार्य करण्यासाठीं स्वामी नारायण यांनीं महिला प्रचारीका तयार केल्या व त्यांच्या करवीं स्त्रीवर्गांत आवश्यक त्या सुधारणा घडवून आणिल्या.

प्रार्थनेसाठीं व उपासनेसाठीं देवमंदिरांची जरूरी ओळखून स्वामी नारायण यांनीं गुजराथ व सौराष्ट्र प्रांतांत जागोजाग मंदिरें स्थापन केलीं. आजही शिल्पकलेच्या दृष्टीनें ती भव्य मंदिरें पहाण्यासारखीं आहेत.

संस्कृत भाषा म्हणजे देवभाषा. आमचे वेद, उपनिषदें, गीता वगैरे धार्मिक ग्रंथ त्या भाषेंत आहेत. ती भाषा आपल्या शिष्यांनीं शिकून त्यांत तरबेज व्हावें अशी

शिक्षणव्यवस्था त्यांनीं केलेली होती. त्यांच्या कित्येक शिष्यांनीं वेदांतसूत्रें, उपनिषदें, भागवत वगैरे ग्रंथांवर सुलभ टीका लिहिल्या आहेत.

स्वामी नारायण हे परिणामकारक प्रचारक होते. जनतेच्या अंतःकरणाचा ठाव कशा रीतीनें घ्यावा हें त्यांना माहीत होतें. त्यांची प्रवचनें मनोवेधक होत असत. मनाला पटणारे दाखले व छोट्या छोट्या गोष्टींनीं ते आपलीं प्रवचनें रंगवीत असत. त्यांच्या चार पट्टशिष्यांनीं त्यांचीं तीं प्रवचनें वेळोवेळीं लिहून घेऊन 'वाचनामृत' या नांवानें तीं नंतर प्रसिद्ध केलीं.


स्वामी नारायण हे सतत तीस वर्षें जनतेंत फिरून नानाप्रकारें लोकोद्धाराचें कार्य तळमळपूर्वक करीत होते. तोच कित्ता त्यांच्या शिष्यांनीं गिरविला.

वयाच्या ४९ व्या वर्षी १८३० सालीं त्यांनीं आपली इहलोकींची यात्रा संपविली.

स्वामी नारायण यांचा जन्म झाला अयोध्येजवळ आणि निधन झालें गुजराथेंत. गुजराथ नि सौराष्ट्र हें त्यांचें कार्यस्थळ होतें. जे जे त्यांच्या सहवासांत आले ते ते भारले गेले. ते एक अलौकिक पुरुष होऊन गेले. त्यांच्या पुण्य स्मृतीस आमचे शतशः प्रणाम.

स्वामी नारायण यांच्या निधनास आज सुमारें एकशें सदतीस वर्षें होऊन गेलीं. आजही स्वामी नारायण पंथीयांचें कार्य गुजराथ–सौराष्ट्रमाध्यें अखंडीतपणें चालू आहे.

(आधारीत)






# बाबांनीं बुद्धि दिली

कु. मृदुला वामन वाझकर (प्रवीण टेरेस, २० बनहाम लेन, गिरगांव) ह्या लिहितात कीं,

श्री. साईबाबा संकटाला कसे धावून येतात त्या विषयींचा माझा एक अनुभव आपणास पाठवीत आहे.

आमच्या घरची सर्व मंडळी साईभक्त आहेत. रोज आम्हीं साईचरित्र वाचतों, दर गुरुवारीं सर्वजण बाबांची आरती करतों, वर्षांतून एकदां शिरडीची वारीहि करतों. आम्हांला साईबाबांची फार चांगली प्रचीति आली आहे. सन १९६२ च्या डिसेंबर-मध्यें एका शनिवारीं माझे आईवडील पुण्यास गेले, तेथें आठ दिवस राहून दुसऱ्या शनिवारीं महाबळेश्वरीं जाण्याचा त्यांनीं विचार केला. मी पण त्या शनिवारीं मुंबईहून त्यांच्याबरोबर महाबळेश्वरला जाण्यासाठीं पुण्याहून एस. टी. चीं तिकिटें रिझर्व करण्यास सांगितलें आणि मी माझी धाकटी चुलती, लहान चुलत भाऊ व एक मैत्रिण असे आम्हीं सकाळीं ७। ची ट्रेन पकडण्यास टॅक्सीनें ६। वाजतां बोरीबंदरला गेलों. गाडी प्लॅटफॉर्मला लागली होती. पण आंत दिवे नव्हते व गर्दीही नव्हती. आम्हीं वर सामान ठेवून गाडीत बसलों होतों. तेवढ्यांत माझ्या चुलतीची एक मैत्रिण भेटली म्हणून गप्पा करण्यास आम्हीं खालीं उतरलों. कांहीं वेळानें माझे चुलते आम्हाला पोंचविण्यास बसनें आले व सामान कोठें आहे असें विचारलें व गाडींत जाऊन पाहूं लागले; तेव्हां त्यांना तेथें आमच्या दोन बॅग्ज दिसल्या नाहींत. (एक चुलतीची व एक मैत्रिणीची) चुलतीनें सर्व पैसे व कपडे वगैरे सामान बॅगमध्येंच ठेवलें होते. आम्ही सगळीकडे शोधलें परंतु त्या मिळाल्या नाहींत. आम्ही सर्व घाबरलों व बाबांचा धांवा सुरू केला. तीनचार मिनिटांची वेळ गेली न गेली तोंच

एक रेल्वे पोलिस डब्याच्या बाहेर उभा राहून आमची हाल–चाल पहात होता. त्याने आम्हाला तुमचे कांहीं हरवलें आहे का ? असें विचारले. आम्ही 'हो' म्हणताच तो. म्हणाला, "मी मुद्देमालासह चोर पकडला आहे. माझ्याबरोबर पोलिस स्टेशनवर चला आम्ही सर्व राहिलेले सामान घेऊन त्याच्याबरोबर रेल्वे पोलिस स्टेशनवर गेलो.

एक तरुण चांगल्या पोषाखामध्यें तेथें उभा होता. त्यानेच आमच्या बॅग्ज नेल्या होत्या व त्याच पोलिसानें संशय घेऊन त्याला हटकले व तो त्याला पोलिस स्टेशनवर घेऊन आला होता. पोलिस इन्स्पेक्टरला आम्ही त्या आमच्याच बॅग्ज म्हणून खात्री पटवून दिली, पण कायद्याप्रमाणें केसचा निकाल लागे-पर्यंत बॅग्ज देण्यास त्यानें नकार दिला. आदल्याच दिवशीं बोरीबंदर स्टेशनवरून चोरलेली एका युरोपियनाची मोठी सूटकेस दाखवून आम्हाला बॅग्ज दोनतीन दिवसांनी मिळतील वगैरे सांगू लागला. माझ्या चुलत्यांनीं त्याला आमची परिस्थिती नीट समजावून सांगितली. इन्स्पेक्टर मुसलमान होता. श्रीबाबांनीं त्याला बुद्धी दिली. तो म्हणाला, तुमच्यापैकीं कोणीतरी इकडे थांबत असल्यास बॅग्ज परत करतो. चुलत्यांनीं ते कबूल केले व आम्हाला बॅग्ज मिळाल्या आणि आम्ही दुसऱ्या गाडीनें पुण्यास गेलों व ठरल्याप्रमाणें कार्यक्रम उरकून सुखरूप मुंबईस परतलो. अशा तऱ्हेनें श्रीसाईबाबा आमच्या हाकेला धांवून आले. तसेंच ते सर्व भक्तांना संकटांत खात्रीनें मदत करतील. मात्र पूर्ण श्रद्धा असली पाहिजे. बाबांनींच म्हटलें आहे कीं, "जरी हें शरीर गेलो मी टाकून, तरी मी धांवेन भक्तांसाठीं."

—कु. मृदुला वामन वाझकर

# श्रीसाईनाथ हॉस्पिटलला देणग्या

(दि. १।१।६७ ते ३०।४।६७ पर्यंत भक्तांकडून आलेल्या देणग्यांचा साभार स्वीकार)

| भक्ताचें नांव | गांव | रु. पैसे |
|---|---|---|
| प्रेमा पाटील | मुंबई ५८ | १०-०० |
| श्री. बी. एस. डिंग्रा | ,, | ११-०० |
| ,, व्ही. सी. कापडीया | ,, ४ | १००-०० |
| ,, प्रभाकर कृष्णाजी पालकर | मुंबई ५८ | ११-२५ |
| ,, जी. बी. ठाकरे | मुंबई | २१-०० |
| ,, श्यामदास पी. वधवा | ,, | ५१-०० |
| ,, देवराज सोनी | इन्दोर | २१-०० |
| मिसेस पुष्पा एम्. शिंघी | मुंबई ६४ | ११-०० |
| श्री. व्ही. डी. घुले | जबलपूर | १०-०० |
| डॉ. एन्. ललीता | बेल्लारी | १२५-०० |
| श्री. एच. व्ही. गोविंदराज | मुंबई | १०-०० |
| ,, भावाजी सोमाजी | ,, १२ | ७-०० |
| ,, आर. एम्. बलवल्ली | ,, | १०-०० |
| ,, के. जी. नरीमन | ,, | २५-०० |
| सौ. पी. एम्. मेहता | ,, | ५-०० |
| श्री. ल. जे. बक्सानी | पुणा १ | २६-०० |
| ,, अरुण जी. जोशी | मुंबई १४ | ५-०० |
| ,, जे. व्ही. देसाई | पुणा | ५-०० |
| ,, नारी थादन | ,, | ५-०० |
| ,, पी. एल. पटेल | मुंबई | ११-०० |
| ,, के. आर. पटेल | मुंबई ७ | ५१-०० |
| सौ. आशा य. देसाई | ,, | २५-०० |
| डॉ. सौ. आर. एम्. भट | ,, २६ | ११-०० |
| डॉ. श्रीमती सरोज ट्रालसवाला | ,, ७ | १५-०० |

| | | |
|---|---|---|
| डॉ. श्री. व्ही. एम्. भट्ट | ,, २६ | ११—०० |
| श्री. बी. एन्. अडाणा | ,, १२ | ५०१—०० |
| ,, के. एस. सुब्बान्ना | ,, ६ | २०—०० |
| ,, ओ. पी. शर्मा | ठाणा | २५—०० |
| ,, एस. पी. वधवा | मुंबई ७७ | ५१—०० |
| ,, आर. सी. जोशी | पुणा २ | ११—०० |
| श्री. टी. सी. नरसिंह मूर्ति | चिकपेट—तुमलेम | २५—०० |
| ,, एस. एम्. कोठारी | मुंबई | २५—०० |
| ,, मेघा गजानन भट्ट | ,, | ५१—०० |
| ,, पांडुरंग सिताराम चेन्नावार | फेरूर ( नांदेड ) | १२५१—०० |
| ,, रसिकलाल जी. अडोनी | झरीया | २५—०० |
| ,, एस. जी. रणदीवे | मुंबई | २५—०० |
| अनुसयाबाई ना. पवार | मालेगांव ( पुणे ) | ११—०० |
| सौ. एस. एस. वैद्य | मुंबई | ११—०० |
| श्री. केशवलाल दवावाला | ,, | ११—०० |
| ,, बी. एस. डिंग्रा | मुंबई | ११—०० |
| ,, जीतलाल जैसवाल | हैद्राबाद | ६०—५० |

## हॉस्पिटलसाठीं मनिऑर्डरीनें आलेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| सौ. इंदिराबाई ग. पत्की | जाखपुर | ५—०० |
| ,, ई. व्ही. भास्कर | मुंबई २२ | ५—०० |
| ,, एम्. एम्. कुळकर्णी | गोकाक | २५—०० |
| ,, क्रान्ती नातू | अलाहाबाद | ९—०० |
| श्री. श्रीपाद दत्तात्रय कुळकर्णी | टाकवेड | २५—०० |
| ,, रामचंद्र | इन्दौर | १५—०० |
| मेजर व्ही. पी. नातू | कोल्हापूर | ५—०० |
| सौ. मेरी कम्हाता | मुंबई ५ | २१—०० |
| श्री. ए. बी. पाटील | मुगली | ९—०० |
| ,, व्ही. बी. मालीपाटील | कवालूर | १०८—०० |
| ,, व्ही. आर. सातपुते | तेलहास | २५—०० |
| मेजर एम्. व्ही. नातू | नवीदिल्ली १४ | ११—०० |
| ,, एम्. व्ही. नातू | डेहराडून | ६१—०० |
| श्री. एस. जी. सावंत | मुंबई २ | ५१—०० |

# मुंबई कचेरींत जमा झालेला हॉस्पिटल-फंड

## ( चेकने आलेले )

हॉस्पिटल फंड जमा-मुंबई ऑफिसांत-दि. १३-१-६७ ते १२-५-६७

| | | |
|---|---|---|
| मे. आईल सील्स म्या. कं. | मुंबई | ५०००-०० |
| श्री. आर. एन्. पटेल | दादर | १००१-०० |
| डॉ. होमी ए. बाटलीवाला | मुंबई | ५०१-०० |
| मेजर बि. एल. बींद्रा | मिरत | ५००-०० |
| श्री. रसीक शहा | मुंबई | २८०-०० |
| मे. मेनका ब्रदर्स | ,, | २५१-०० |
| ,, एम्. के. इन्डस्ट्रिज | मालाड | २५०-०० |
| स्टेट बँक-पी. बी. पारीक ट्रस्टचे | मुंबई | २०४-७५ |
| श्री. एच. जे. शहा | चेंबूर | १८०-०० |
| ,, डी. टी. मोदी | मुंबई | १२५-०० |
| ,, यु. डी. शेख | विलेपार्ले | १०१-०० |
| ,, एन्. जे. खांडवाला | मलबारहिल | ५१-०० |
| ,, एम्. टी. सिंघी | मालाड | ५१-०० |
| मे. अमर डेकोरेटर्स | मुंबई | ५१-०० |
| श्री. व्ही. डी. वैद्य | दादर | ५१-०० |
| डॉ. चंपा आफळे | न्यु. दिल्ली | ४४-०० |
| कु. शरयु तळपदे | मलबार हिल | ३३-०० |
| श्रीमती देविका सी. मेहता | चेंबूर | ३०-०० |
| सौ. एच. पी. पुष्पलता | हैद्राबाद | २५-०० |
| कॅप्ट. क. दयाशंकर | दिल्ली | २५-०० |
| श्री. व्ही. एस. पंडित | मलबार हिल | १५-०० |
| श्री. व सौ. आर. एच. टिपणीस | कलकत्ता | ११-०० |
| ,, पी. बी. देसाई | अहमदाबाद | ११-०० |
| ,, के. अनंदा राव | धारवाड | १०-०० |
| मेजर पी. एस. नायडू | न्यू दिल्ली | ५-०० |

## ( रोख आलेले )

| | | |
|---|---|---|
| श्री. बी. मेहता | घाटकोपर | ३००-०० |
| शेठ. पुखराज | माटुंगा | २०१-०० |
| श्री. एच. वाकजी | द. आफ्रिका | १०४-०० |
| ,, बी. जी. हळदणकर | गोरेगांव | १०१-०० |

| | | |
|---|---|---|
| श्रीमती विजया बी. क्षीरसागर | दादर | १०१-०० |
| सौ. श्री. शहाणे | डोंबिवली | १०१-०० |
| श्री. आर. एन्. जोशी | खार | १०१-०० |
| मे. गोल्ड सोप कं. | मुंबई ९ | ७१-०० |
| श्री. एम्. के. पाटील | कल्याण | २५-२५ |
| ,, व्ही. एन राज | मुंबई ४ | २५-०० |
| ,, एस. पनीया | कच्छ | २०-०० |
| मे. कोहिनूर संतोश स्टोअर्स | दादर | ११-०० |
| श्री. ओ. पो. शर्मा | मुंबई ६ | १७-०० |
| ,, पी. पी. व्ही. जे. नंबीआर | न्यु. दिल्ली | १०-०० |
| ,, जे. एस. चौबळ | अंधेरी | १०-०० |
| ,, एन. एस. गोपाळ आयर | शिव | ७-०० |
| ,, एस. पी. वैद्य | अंधेरी | ५-२५ |
| ,, जी. आर. भट | सांताक्रूझ | ५-०० |
| ,, एम्. जी. भट | ,, | ५-०० |
| ,, मदन जी. भट | ,, | ५-०० |
| ,, माधव जी. भट | ,, | ५-०० |
| सौ. कमला आर. मडकीकर | गोवा | ५-०० |
| श्री. ए. आर. करमरकर | मुंबई ४ | ५-०० |
| ,, एस. एस. कट्ट | दादर | ५-०० |
| ,, मोती प्रकाश | चित्तरंजन | ५-०० |
| साईभक्त ५+५+५+१० | मुंबई | २५-०० |

**बिल्डींग फंड**

श्री. ओ. पी. शर्मा रु.७

**शिक्षण फंड**

श्री. जे. जी. प्रधान दादर रु. ५

,, ऑ. पी. शर्मा मुंबई रु ७

या सर्व देणगीदारांचे शिर्डी-संस्थान व्यवस्थापक आभारी आहेत.

# संत नामदेवमहाराज

***************************

## जीवनांतील कांहीं तेजस्वी प्रसंग

लेखक : वि. के. छत्रेशास्त्री

शिलामूर्तीतील पंढरीश–राव । बघुनि ज्याचा तो बाल–विमल भाव ॥
इष्ट पुरवितो नैवेद्य सेवुनीया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥ १ ॥

बाल नामदेवाचे वडील दामाशेटी गांवाला गेले होते. 'पांडुरंगाला नैवेद्य मी अर्पण करीन' असें नामानें त्यांच्याजवळ कबूल केलें होतें. त्याप्रमाणें गोणाई मातेनें फडक्यांत बांधून दिलेलें नैवेद्याचें ताट घेऊन नामा देवळांत गेला व पांडुरंगापुढें ताट ठेवून प्रार्थनापूर्वक हात जोडून म्हणाला, 'देवा जेवा आतां पोटभर. आज बाबांनीं ही कामगिरी माझ्याकडे दिली आहे.' बराच वेळ झाला तरी देव जेवीनात. तेव्हां नामा रडकुंडीस येऊन हात जोडून म्हणाला. 'देवा जेवा ना लौकर. तुम्हीं जेवला नाहीं तर आई रागावेल माझ्यावर. बाबाहि आल्यावर झोडपतील, सांगितलेलें काम नीट केलें नाहीं म्हणून.' तरीहि देव गप्पच! मग मात्र नामा एकेरीवर आला. तो खांबावर कपाळ आपटून प्राण द्यावयास तयार झालेला पाहून देव घाबरले व जेवूं लागले. नामालाहि ओढून आपल्याच ताटांत आपलेबरोबर जेवावयास लावले!' जेवण होतांच ताट घेऊन नामा घरीं गेला. रिकामें ताट पाहून आईनें विचारलें 'अरे नैवेद्य कुठें आहे?'

**नामा :** आई, देवानें खाल्ला!

**आई :** पाषाणाचा देव नैवेद्य खातो होय! तूंच खाल्ला असशील, थांब, आतां ते आल्यावर सांगतें.

**नामा :** आई देवाशपथ, देवानें नैवेद्य खाल्ला!

दामाशेटी घरीं आल्यावर त्यांच्या कानावर गोणाईनें ही गोष्ट घातली. त्यांस नवल वाटलें व शंकाहि आली. दुसऱ्या दिवशीं ते नामदेवासह नैवेद्य घेऊन गेले व नामास म्हणाले, 'हं, कालच्या सारखा हा नैवेद्य देवाला खायला लाव.' नामाने देवाला खूप आळवून पाहिलें, पण देव कांहीं नैवेद्य खाईनात. असें पाहून दामाशेटी म्हणाले, खोटेपणाबद्दल तुला आतां येथेंच पांडुरंगासमोर झोडपुन काढतों' असें म्हणून इकडे तिकडे शिपटी–काठी पाहूं लागले. नामा घाबरला, रडकुंडीस आला व देवाची प्रार्थना करूं लागला व देवाची प्रार्थना करूं लागला. तोंच—

"ऐसा प्रसंग पाहुनि आला द्रव त्या दयानिधी हरितें ।
जेवी भरभर भरभर, निमिषार्धें ताट जाहलेंहि रितें ! ॥"

देवाला दया आली व गुप्त रूपानें भरभर जेवून त्यानें ताट रिकामेंहि केलें.

Scanned with OKEN Scanner

बालपणांत मन निर्मळ असतें. देव प्रत्यक्ष जेवतो अशी नामाची कल्पना व बालहट्ट पुरविणें हें मोठ्या माणसाचें कर्तव्य असतें. पांडुरंग तर सर्व जगाचा मायबाप, त्यास तो हट्ट पुरविणें भाग पडलें. 'भोळा भाव सिद्धीला जाव' ही म्हण खरी आहे. महाज्ञानी लोकांना जें साधत नाहीं तें भोळ्या भावाच्या व निर्मळ मनाच्या मुलास सहज साधतें. उदा : ध्रुव, उपमन्यु.

शिरीं थापटतां साधुसमूहांत । जाति कोपें जे झणीं राउळांत ॥
देव बोधिति तूं सद्‌गुरु कराया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥ २ ॥
बधुनि सद्‌गुरुचे पाय शैवालिंगीं । नवल वाटे; ठेवितां अन्य जागीं ॥
लिंग तेथें ! तूं शरण गुरुराया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥ ३ ॥

गोरा कुंभाराकडे एकदां सर्व संतमंडळी जमली होती—( ज्ञानदेव—नामदेव वगैरे ) परमार्थपर सुखसंवाद करतां करतां मुक्ताबाईनें सहज सुचविलें 'गोरोबा मडकीं कच्चीं आहेत कीं पक्कीं आहेत एकदां तपासा कीं' गोरोबांना त्यांतील भावार्थ समजला. त्यांनी हातांत थापटणें घेतलें व प्रत्येका संतांचे मस्तकावर थापटणें मारून ते तपासूं लागले. कोणीहि त्यांस त्याबद्दल विरोध केला नाहीं. नामदेवाच्या मस्तकावर थापटणें उगारतांच त्यांनीं तें वरचेवर पकडलें व रागावुन म्हणाले, 'हे हो काय करतां ? कांहीं शिष्टाचार आहे कीं नाहीं ?' त्याबरोबर कुणीतरी मोठ्यानें बोलले 'गोरोबा, मडकें कच्चें आहे हो कच्चें !' हे शब्द आपणांस उद्देशून असल्याचें नामदेवास कळलें व ते रागारागानें सभेंतून उठून पांडुरंगाकडे गेले व आपलें गाऱ्हाणें त्यासमोर मांडलें. देवांनीं तें ऐकून घेऊन सस्मित उत्तर केलें, 'बरोबर आहे.'

'म्हणजे ? भर सभेंत तुझ्या भक्ताचा अपमान ? देवा, शोभतं हें बोलणं तुला ?'

'अरे, पण दुसऱ्या कोणी तक्रार केली कां ?'

'नाहीं.'

'कां ?'

'त्यांचा कदाचित् आधींच बेत ठरला असेल, माझा असा सभेंत अपमान करण्याचा.'

'तें कसेंहि असलें तरी 'कच्चं मडकं' हा अभिप्राय बरोबर आहे !'

'वा देवा, तुम्ही त्यांचीच बाजू घेतां !'

'अरे, त्याचा भावार्थ लक्षांत आण.'

'हं, सांगा देवा.'

'अरे तूं अजून गुरु केला नाहींस.'

'ज्याच्यासाठीं गुरु करायचा तो तूं तर माझ्याशीं मित्रत्वानें बोलतोस. मला काय जरूरी गुरुची ?'

'अरे, 'सद्‌गुरुवांचोनी सांपडेना सोय !' कृष्णावतारांत मी नाहीं कां सांदीपनीगुरुचें घरीं बारा वर्षें राहिलों ?'

बाळपणांत मन निर्मळ असतें. देव प्रत्यक्ष जेवतो अशी नामाची कल्पना व बालहट्ट पुरविणें हें मोठ्या माणसाचें कर्तव्य असतें. पांडुरंग तर सर्व जगाचा मायबाप. त्यास तो हट्ट पुरविणें भाग पडलें. 'भोळा भाव सिद्धीला जाव' ही म्हण खरी आहे. महाज्ञानी लोकांना जें साधत नाही तें भोळ्या भावाच्या व निर्मळ मनाच्या मुलास सहज साधतें. उदा : ध्रुव, उपमन्यु.

> शिरीं थापटतां साधुसमूहांत । जाति कांपें जे क्षणीं राउळांत ॥
> देव बोधिति तैं सद्‌गुरु कराया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥ २ ॥
> बघुनि सद्‌गुरुचे पाय शैवलिंगीं । नवल वाटे; ठेवितां अन्य जागीं ॥
> लिंग तेथें । तैं शरण गुरुराया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥ ३ ॥

गोरा कुंभाराकडे एकदां सर्व संतमंडळी जमली होती—( ज्ञानदेव—नामदेव वगैरे ) परमार्थपर सुखसंवाद करतां करतां मुक्ताबाईनें सहज सुचविलें 'गोरोबा मडकीं कच्ची आहेत कीं पक्कीं आहेत एकदां तपासा कीं' गोरोबांना त्यांतील भावार्थ समजला. त्यांनीं हातांत थापटणें घेतलें व एकेका संतांचे मस्तकावर थापटणें मारून ते तपासूं लागले. कोणीहि त्यांस त्याबद्दल विरोध केला नाहीं. नामदेवाच्या मस्तकावर थापटणें उगारतांच त्यांनीं तें वरचेवर पकडलें व रागावून म्हणाले, 'हे हो काय करतां ? कांहीं शिष्टाचार आहे कीं नाहीं ?' त्याबरोबर कुणीतरी मोठ्यानें बोलले 'गोरोबा, मडकें कच्चें आहे हो कच्चें !' हे शब्द आपणांस उद्देशून असल्याचें नामदेवास कळलें व ते रागारागानें सभेतून उठून पांडुरंगाकडे गेले व आपलें गाऱ्हाणें त्यासमोर मांडलें. देवांनीं तें ऐकून घेऊन सस्मित उत्तर केलें, 'बरोबर आहे.'

'म्हणजे ? भर सभेंत तुझ्या भक्ताचा अपमान ? देवा, शोभतं हें बोलणं तुला ?'

'अरे, पण दुसऱ्या कोणी तक्रार केली कां ?'

'नाहीं.'

'कां ?'

'त्यांचा कदाचित् आधींच बेत ठरला असेल, माझा असा सभेंत अपमान करण्याचा.'

'तें कसेंहि असलें तरी 'कच्चं मडकं' हा अभिप्राय बरोबर आहे !'

'वा देवा, तुम्ही त्यांचीच बाजू घेतां !'

'अरे, त्याचा भावार्थ लक्षांत आण.'

'हं, सांगा देवा.'

'अरे तूं अजून गुरु केला नाहींस.'

'ज्याच्यासाठीं गुरु करायचा तो तूं तर माझ्याशीं मित्रत्वानें बोलतोस. मला काय जरूरी गुरूची ?'

'अरे, 'सद्‌गुरुवांचोनी सांपडेना सोय !' कृष्णावतारांत मी नाहीं कां सांदीपनीगुरूचें घरीं बारा वर्षे राहिलों ?'

'बरं मग हें तूंच मला आधीं कां नाहीं सांगितलेंस ?'

'अरे कान टोचावयास सोनारच हवा !'

'बरं मग कोणाला शरण जाऊं ?'

'गांवाबाहेर शिवमंदिरांत विसोबा खेचर आहेत, त्यांना शरण जा.' नामदेव गेले तों शिवलिंगावर पाय ठेवून ते झोंपलेले. नामदेवांस नवल वाटलें. विसोबा जागे होऊन म्हणाले, 'अहो, माझे पाय जरा शिवलिंगावरून बाजूस करा.' नामदेवानें पाय उचलून बाजूस ठेवले तों त्याखालीं शिवलिंग! जिथें पाय ठेवावेत तिथें शिवलिंग! विसोबांची योग्यता त्यांस कळून आली. त्यांचे पाय धरले. नामदेवांस अनुग्रह मिळून ते कृतार्थ झाले.

वृत्ति ज्यांची भजनीं बघूनि दंग । करी गृहचिंता स्वयें पांडुरंग ।
शब्द पार्थी दिधला खरा कराया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥ ४ ॥

आपला भक्त तर भजनांत दंग व त्यामुळें घराकडे-बायकामुलांकडे-आपण बघितलें पाहिजे या जाणिवेनें पांडुरंग स्वहस्तें परहस्तें त्याच्या घरीं अन्न, धान्य, कपडा-लत्ता वगैरे पोंचवीत असत. नामदेवास तें कळणार नाहीं याची मात्र ते खबरदारी घेत. भगवंतांनीं, आपण अनन्य भक्तांची काळजी कशी वाहतों हें पार्थास गीतेंत स्पष्ट सांगितलें आहे.

अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ अ. ९–२२ ॥

यांत योगक्षेम याचा अर्थ नीट लक्षांत घ्यावा. योग—नसेल तें पुरविणें; क्षेम—असेल त्याचें रक्षण करणें. बायकापोरांची अगदींच उपासमार होऊन आपल्या नादीं लागल्यामुळें आपणांस (तुकोबांची जिजाई वाहत असे तशी) शिव्यांची लाखोली मिळणार नाहीं इतकीच मदत भगवान् करीत असत.

बघुनि निर्धनता देयमिषें लीला । दिलें देवें धन, कळुनि उबग आला ॥
देति दीनां ते, तरावया माया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥ ५ ॥

एकदांमात्र पांडुरंगाला भक्ताच्या बायकापोरांचें दैन्य पाहून प्रेमाचा पुळका आला. त्यांनी व्यापाऱ्याचा स्वतः वेष घेतला, गरुडाला बैल बनविलें व त्याच्या पाठीवर होनांचें पोतें लादून नामदेव घरीं नसतां ते आले. पाहुण्यास पाहिल्याबरोबर दारिद्र्यानें गांजलेल्या राजाईनें सांगितलें 'धनी घरी नाहींत!' पण, 'मी नामदेवांचें कांहीं देणें लागतों त्याबद्दल हें पोतेभर होन आणले आहेत. ते स्वीकारून फार दिवस देणें राहिल्याबद्दल क्षमा करावी' अशी विनंति केली. तेव्हां मात्र तिचा रागरंग क्षणार्धांत बदलला. तिनें णी ठेवून घेतली व त्याला राहण्याचा व जेवणाचा आग्रह केला. पण नामदेवाची ठ पडेल म्हणून देवांनीं कांहींतरी सबब सांगून तेथून झटकन् पाय काढला! राजाईनें ोच कांहीं होन वाण्याला नेऊन देऊन हवें असलेलें तूप, साखर, गूळ, तेल वगैरे

जिन्नस भरपूर आणले, उत्तम स्वयंपाक केला व पतीची वाट पहात बसली. नामदेव आले. पाहतात तों सर्वांचे चेहेरे विशेष फुललेले. त्यांना नवल वाटलें. हातपाय धुवू पाटावर बसतात तों जेवणाचा बेत विशेष दिसला. पुरणपोळीचा बेत केलेला पाहू त्यांनीं कारण विचारलें. पत्नीनें सगळी हकीकत मोठ्या आनंदानें सांगितली. नामदेवांन असा कोणी देणेकरी आठवेना. बऱ्याच वेळानें ही सगळी करणी पांडुरंगाची आहे त्यांनीं ओळखलें. लगेच ब्राह्मणांस व गोरगरीबांस बोलावून त्यांनीं ते सारे होन वाटू टाकले व स्त्रीला म्हटलें, 'अशे श्रमाशिवाय मिळालेलें उपभोगीत बसलों तर अंगा कामाचा आळस येईल, पोटाची चिंता नसल्यामुळें देव आठवणार नाहीं,' रिका मन दुर्व्यसनाकडे धांव येईल व देव अंतरेल म्हणून हें विष घरांतून गेलें, आतु मनाला शांति आली.'

निशीं उडतां कौलार चंडवातें । रक्षि चक्रें सकुटुंब देव ज्यांतें ॥
वृष्टि सरतां तें रची, शिजवि काया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥

एकदां नामदेव बायकोमुलांसह घरांत रात्रीं झोंपले होते. तों एकाएकीं सो ऱ्याचा वारा वाहूं लागला व नामदेवाच्या घराचे छप्पर उडून गेलें. हें पांडुरंगान ध्यानांत येतांच त्यांनीं सुदर्शन चक्राला पुढें पाठवून आज्ञा केली कीं 'तूं छपरा सारखा फिरत रहा.' थोड्याच वेळांत मुसळधार पाऊस सुरूं झाला. पण सुदर्श चक्राच्या भ्रमणामुळें नामदेवाचे कुटुंबापैकीं कोणाचेहि अंगावर पाण्याचा एक थें पडला नाहीं. पाऊस थांबल्यावर पांडुरंग स्वतः तेथें आले व त्यांनी उडालेले छप्पर आण स्वतः मेहनत घेऊन पूर्ववत बांधले व कौलें त्यावर नीट बसवीत आहेत तोंच नामदे जागे झाले व त्यांना छपरावर कांहीं खडबड ऐकूं आली. ते बाहेर येऊन पहातात पांडुरंग स्वतः घर शाकारीत आहेत! नामदेवांनीं इकडे तिकडे पाहिलें, त्यांना स प्रकार कळला. प्रेमाचा गहिंवर आला. त्यांनीं देवास खालीं उतरवून गाढ आलिंग दिलें व जेऊं घातलें. देव अशाप्रकारें भक्ताचें संकटापासून रक्षण करीत असतो.

जनी ज्यांची दासीहि भक्त थोर । स्वयें लावीं हरि तीस हातभार ॥
दळणिं कांडणिं वा धुणींहि धुवाया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥ ७ ॥

नामदेवांची जनी नांवाची एक दासी होती. ती त्यांचें घरकाम करीत अस धन्याप्रमाणें किंबहुना धन्याहून अधिकच तिची पांडुरंगावर भक्ति होती. काम करतां करतां ती 'विठ्ठल' विठ्ठल' म्हणे व रंगून जाई. एकादे वेळेल अशी ती रंगल म्हणजे तिची समाधि लागे. काम राहून जाई. तिची काळजी देवाला! कामें राहिल्या मुळें मालकीण रागावूं नये म्हणून देव स्वतः कधीं कधीं तिच्या कामांत ‹ दत करीत दळावयास, कांडावयास, धुणी धुवावयास सुद्धां. देवाला असें काम करतांना कमीपण न वाटतां उलट आनंदच वाटत असतो. धन्य जनीसारखे भक्त कीं ज्यांच्या भक्तीला देव असा भुलतो.

सर्वं घेउनि जे संत थोर थोर । करितीं भारतिं या भक्तिचा प्रचार ॥
स्मरति सादर ते शीख आजही ज्यां । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥

नामदेवरायानें ज्ञानेशादि थोर संतांसह भारतांतील यात्रा केल्या. याची साक्ष त्यांचें वाङ्मय अजून देत आहे. नामदेव पंजाबांतहि गेले होते व भक्तीचा प्रसार त्यांनीं कीर्तनद्वारें केला. शीखांस इतका तो पटला कीं नामदेवांची वाणी त्यांनीं आपल्या भाषेंत अनुवादून आपल्या उपासनेंत समाविष्ट केली आहे. जिज्ञासूंनीं 'श्रीसाईलीला' मासिकाच्या १९६२ च्या कांहीं अंकांत श्री. कविटकर यांचे लेख या विषयांत वाचावेत.

नागनाथालयिं कीर्तनरसरंगीं । हाय ! हांकालिले, जाति पृष्ठभागीं ।
फिरे देऊळ तों, भक्त तो दिसाया । प्रणति सादर त्या नामदेवराया ॥९॥

आंवढ्या नागनाथाला नामदेवराय संतमंडळीबरोबर गेले असतां त्यांनीं देवासमोर कीर्तनाला सुरवात केली. तेथील पुजाऱ्यांना त्यांच्या कामांत ती कटकट वाटून संतमंडळीस तेथून निघून जाण्यास फर्माविलें. तेव्हां ही संतमंडळी मुकाट्यानें देवाचे पाठीमागें जाऊन देवाला आर्तस्वरानें आळवूं लागली. देवा, तुझ्यापुढें कीर्तन करायासुद्धां चोरी झाली कां ! तुला कंटाळा आला कां आमच्या कीर्तनांचा ! छे ! असें होणें शक्य नाहीं; कारण 'मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि नारद ॥ आणि त्याच वेळांत आश्चर्य घडलें ! तें सर्व देऊळच क्षणार्धांत फिरलें व देवानें आपलें तोंड भक्तासमोर केलें. नंदी समोर होता तो आतां पाठीमागें झाला. हें पाहतांच भक्तांनीं भगवन्नामाचा जयजयकार केला. पुजारी लाजले व शरण आले. औपचारिक भक्तीपेक्षां आंतरिक भक्ति देवाला अधिक प्रिय हें देवानें आपलें तोंड भक्तासमोर फिरवून जगजाहीर केलें.

नित्य जगदीशहि सुखालाप मोदें, करी ज्यांच्यासह, विरह दुःखही दे ।
'भक्ति नौका घ्या' म्हणति 'भव तराया' प्रणति सादर त्या नामदेवराया ॥१०॥

पांडुरंग आवडत्या नामदेवाबरोबर मोठ्या आवडीनें हितगुज करीत असत. एखादे दिवशी त्यांची भेट झाली नाहीं तर देवास करमत नसे. 'अशी एकनिष्ठ भक्ताची नौका घेऊन, तिच्यांत बसून हा भवसागर याच जन्मांत तरा' असें नामदेवराय कळकळीनें मुमुक्षूंस सांगत आहेत.

भक्ति पथ बहु सोपा । पुण्य, नागवे या पापा ॥
येणें जाणें खपा । येणेंचि एके खंडली ॥
उभारूनी बाहा । विठो पालवीत आहे ॥
दासा मीच साहे ( साह्य ) । मुखें बोले अपुल्या ॥
भाविक विश्वासी । पार उतरले त्यासी ॥
तुका म्हणे नासी । कुतर्क्यांचे कपाळी ॥

———

# श्रीरामनवमी उत्सव शके १८८९

श्री सच्चिदानंद सद्गुरु साईबाबामहाराज शिर्डी, ता. कोपरगांव जि. अ. न
यांचा श्रीरामनवमी मि. चैत्र शु. ८ दिनांक १८ एप्रिल १९६७ मंगळवा
पासून श्रीसाइसमाधी मंदिर येथें साजरा झाला.

या उत्सवास मुंबई, पुणें, सोलापूर, नासिक, नगर, मराठवाडा, नागपूर, विद
मद्रास, आंध्र, म्हैसूर, गुजराथ, खानदेश वगैरे ठिकाणाहून बरेच भक्तलोक आपल
कुटुंबांतील मुलाबाळासह श्रीसाईंचे दर्शनास आले होते, तसेंच शिर्डीजवळील दहावी
कोसातील खेड्यापाड्यातून खेडुतहि रामनवमी यात्रा पाहणेस आले होते. उत्सवाकरित
मुद्दाम मांडव ध्वज तोरणें, कमानी, विद्युतदिपानी सुशोभित करणेत आले होते.

भक्तांना राहणेसाठीं जागा खोल्या डी. डी. टीचे फवारे मारून साफसूफ कर
ठेवणेंत आल्या होत्या. उत्सवांत पिण्याचे पाण्याचा बंदोबस्त ठिकठिकाणी थंड
पाण्याचे माठ व रांजण भरून ठेवून पाणी देण्यासाठीं नोकरांची खास व्यवस्था करणे
आली होती. आलेल्या भक्तांना जेवणाची सोय साई संस्थानच्या अधिकृत भोजनगृहात
नेहमींच्या दरांत मिष्टान्न भोजनाची व्यवस्था नेहमीप्रमाणें करणेंत आली होती
पोलीस बंदोबस्त उत्तम ठेवणेत आला होता. उत्सवाचा कार्यक्रम:—

दिनांक १८ मंगळवार चैत्र शु. ८ या दिवशीं नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त श्रींचे
फोटोची पोथीची मिरवणूक, पहाटे काकडा आरती नंतर मंदिरांतून निघून गुरुपादुका
मार्गे श्रींचे द्वारकामाईंत तेथें भव्य चांदिचे मखरात फोटोची प्रतिष्ठापना व साई
सच्चरित्र अखंड चोवीस तास वाचन. श्रींचे जुन्या कपड्याची प्रसाद रूपानें विक्री
भक्तांचे सामुदायिक अभिषेक पूजा दुपारी ४ ते ६॥ पर्यंत श्री संतकवीदासगणू
महाराजांचे शिष्य श्री. छगनबुवा बारटके पंढरपूर यांचें सुश्राव्य कीर्तन झाले, रात्री
श्रींचे पालखीची गांवांतून बँड, ताशे, सुरसनई, चौघडा, टाळ, मृदंग सनई वगैरे
वाद्यांना दिंडीस मिरवणूक.

दिनांक १९ बुधवार चैत्र शु॥ ९ या दिवशी काकडआरतीनंतर नित्य कार्यक्रमा
व्यतिरिक्त श्रींचे फोटो व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून गुरुपादुका मार्गे समाधी
मंदिरांत. त्यानंतर कोपरगांव येथून श्रीगंगा-गोदावरीच्या कावडीची गांवातून मिरवणूक
कावडी पूजन करून त्या श्रींचे समाधीवर समर्पण करून कावडी वाल्यांना प्रत्येकी एके

श्रीफल प्रसाद श्री. ह. प. अनंतराव आठवलेंनी दिले. नंतर श्रींचे मंगलस्नान वस्त्रार्पण पुष्पार्पण भक्तांचे सामुदायिक अभिषेकपूजन १०॥ ते १२॥ श्रीरामजन्मोत्सवाचे कीर्तन ह. भ. प. अनंतराव आठवले, पुणें यांचें झालें त्यानंतर आरती, तीर्थप्रसाद सायंकाळीं निशाणाची व रथाची मिरवणूक, रात्रौ शोभेचें दारुकाम, रात्रभर मंदिर भक्तांना दर्शनासाठीं खुले. मंदिरांत कलाकारांच्या संगीत गायनवादन हजेऱ्या पहाटे ६ वाजे पर्यंत एकेचाळीस कलाकारांनी हजेऱ्या दिल्या. त्यांना साई संस्थानतर्फे संभावना प्रत्येकी एक रुपया व श्रीफळ देण्यांत आले.

दिनांक २० गुरुवार चैत्र शु. १० या दिवशी नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त भक्तांचे सामुदायिक अभिषेक पूजा, श्रींचे जुन्या कापडाची प्रसादरूपानें विक्री, नंतर गोपाळ-काला कीर्तन, दहीहंडी श्री. ह. भ. प. तुकाराममहाराज आजेगावकर यानी केलें. रात्रौ नेहमीप्रमाणें ( गुरुवारची चावडी ) पालखीची मिरवणूक होऊन उत्सव समाप्त झाला. उत्सवात चहाफराळ व सर्व नोकरांना मिष्टान्न भोजन एक दिवस देण्यांत आले.

उत्सवांतील सर्व जबाबदारी साई संस्थानचे सन्माननीय कोर्ट रिसीव्हर भा. ग. पोतनीससाहेब यांनीं उत्तम टेवली होती. येणेंप्रमाणें श्रीरामनवमी उत्सव सुंदर झाला.


## "साई भक्तांस अमूल्य संधी"

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे, ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी-किंमत टपाल खर्चासह ( स्टँप-तिकिट ) अगर मनीऑर्डरनें पाठवावी.

संपादक

श्री साईलीला मासिक




# एप्रिल १९६७

या महिन्यांत श्रीरामनवमी उत्सव आल्यामुळें भक्तांची गर्दी बरीच होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालीलप्रमाणें:—

**कीर्तन**

( १ ) श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले आयुर्वेद रसशाळा प्रिन्सिपाल कर्वेरोड पुणें, ( २ ) श्री. ह. भ. प. तुकाराममहाराज आजेगांवकर पुणें, ( ३ ) श्री. ह. भ. प. छगनबुवा बारटके श्रीक्षेत्र पंढरपूर, ( ४ ) श्री. ह. भ. प. महादू दिगंबर कुदळे आंबेजोगाई ( मराठवाडा ), ( ५ ) संस्थान गवई विठ्ठलराव मराठे यांची कीर्तनें नेहमीप्रमाणें झाली, ( ६ ) श्री. डी. डी. नानासाहेब रासने पुणें कीर्तन झाले.

**गायन**

कु. प्रतिभा शिमोगा, मुंबई

श्री. शामला राजाराम माजगांवकर, दादर–मुंबई.

श्री. गणेश महाराज वाठारकर संगीत ( भजन ) ( वाठार )

**प्रवचन**

श्री. ह. भ. प. शिवराम भिलाजी पाटील मु. मंगळूर ता. चोपडा जळगांव पू. खा

**लोकनाट्य**

श्री. दत्तोबा तांबे शिरोलीकर मु. शिरोली, ता.जुन्नर ( पुणे )

श्री. तुकाराम खेडेकर मु. नारायण गांव जि. पुणें.

**मिरवणूक**

( गुढीपाडवा ) वर्षप्रतिपदा शके १८८९ या दिवशी सालाबादप्रमाणें सायंकाळीं श्रींचे रथाची मिरवणूक गांवातून निघाली होती व रात्रौ कीर्तन दीपोत्सव करण्यांत आला.

**कांहीं ठळक भक्तांच्या भेटी**

( १ ) मे. ना. दयानंद बांदोडकर, गोव्याचे मुख्यमंत्री.

( २ ) मे. अण्णासाहेब शिंदे केंद्रिय राज्य अन्नमंत्री.

( ३ ) डॉ. डी. बी. भटनागर, मुंबई.

मे. माननीय कोर्ट रिसीव्हर भा. ग. पोतनीससाहेब यांनी श्रीसाई सत्यनारायण पूजा व साईस महापूजा केली.

**हवापाणी**

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.